ग्रंथमाला मासिक पुस्तकांत छापलेलें

एक जुने मानभावी काव्य

Eka Jūne mānabhāvī Kāvya

संशोधक व संग्राहक

कै. विश्वनाथ काशिनाथ राजवाडे

बी. ए.

[illegible]

ग्रंथमाला मासिक पुस्तकांत छापलेलें

एक जुने मानभावी काव्य

Eka June mānabhāvī Kāvya

—:o:—

संशोधक व संग्राहक

कै. विश्वनाथ काशिनाथ राजवाडे

बी. ए.

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

एक जुनें मानभावी काव्य

१ मानभावांच्या जुन्या ग्रंथापैकीं अद्यापि एकहि छापून प्रसिद्ध झाला नाहीं. पेशावरास मानभावांचे कित्येक अर्वाचीन लहानसहान ग्रंथ छापलेले विकत मिळतात. परंतु शालिवाहनाच्या बाराव्या किंवा तेराव्या शतकांतील मानभाव लोकांचा एकहि ग्रंथ अद्याप प्रकाशला गेला नाहीं. ह्याचें कारण, दुसरें तिसरें कांहीं एक नसून, प्रायः आपली अनास्था आहे. मानभाव लोक आपले ग्रंथ इतर लोकांस बघूं देखील देत नाहींत, आपले ग्रंथ गुप्त रहावे अशी त्यांची समजूत आहे, बहुतेक मानभावी ग्रंथ गुप्तलिपींत लिहिलेले आहेत, ती गुप्तलिपी त्या पंथांतील विद्वान् शास्त्र्यांखेरीज इतरांना शिकविली जात नाहीं, वगैरे अनेक कुत्सित कल्पना आज कित्येक वर्षे प्रचलित आहेत. परंतु, माझा जो कांहीं थोडासा ह्या लोकांशीं परिचय झाला त्यावरून ह्या कल्पनांना कांहीं आधार आहे असें बिलकुल दिसलें नाहीं. मानभाव लोक आपले बहुतेक ग्रंथ पंथबाह्य लोकांना दाखवितात, इतकेंच नव्हे तर ते प्रसिद्ध करणारा कोणी भेटल्यास त्यांत ते समाधानच मानतात. त्यांच्या पंथांतील गुप्तलिपींत लिहिलेले बीजात्मक जे ग्रंथ आहेत ते मात्र पंथबाह्य लोकांना ते दाखवीत नाहींत. बाकीचे कोणतेहि ग्रंथ कोणाहि योग्य व श्रद्धावान हिंदूला दाखविण्यास त्यांची यत्किंचित् अडचण नाहीं.

२ मानभावी जुन्या ग्रंथांचें माहात्म्य दोन प्रकारचें आहे. अर्वाचीन मराठी भाषेचे बरेच जुने मासले ह्मणून ह्या जुन्या ग्रंथांचें महत्व जितकें मानावें तितकें थोडेंच आहे. हे ग्रंथ ज्ञानेश्वरीच्या बहुतेक समकालीन असल्यामुळें त्या थोर ग्रंथांचें भाषाशास्त्राच्या दृष्टीनें निर्वचन करण्यास ह्या ग्रंथांचें बरेंच साहाय्य होणार आहे. आणि ह्या मानभावी ग्रंथांची

भाषा त्या वेळच्या मराठीच्या अनेक पोटभेदांपैकीं असल्यामुळें, कोंकणी, देशी, वऱ्हाडी, वगैरे पोटभाषांशीं तुलना करण्यास हे ग्रंथ साधन होणार आहेत. ह्या ग्रंथांचें हें एक माहात्म्य झालें. दुसरें माहात्म्य धर्मविषयक आहे. श्रीमत् शंकराचार्यांनीं पंचायतनपूजेचा प्रघात पाडून, शैव, वैष्णव, शाक्त वगैरे एकेक देवतांच्या उपासकांस इतर दैवतोपासकांशीं स्पर्धा व द्वेष न करण्याचें शिकविलें. परंतु आचार्यांच्या नंतर कांहीं शतकांनीं केवळ शिवाचीच उपासना करणारा असा बसवब्राह्मणप्रणीत लिंगायतपंथ निघाला. प्रारंभीं ह्या बासवी पंथांत जातिभेद बिलकूल नव्हता. त्यामुळें ब्राह्मणक्षत्रियेतर जातींतील अनेक लोक ह्या पंथाचे अनुयायी झाले. शिवाय, जातिहीन असे जैन, बौद्ध वगैरे लहान मोठे पंथ ब्राह्मणक्षत्रियेतर लोकांत प्रचलित होतेच. लिंगायत, जैन, वगैरे पंथांनीं महाराष्ट्रांतील खालच्या प्रतीचे लोक आकर्षिलेले पाहून, कृष्णोपासक व दत्तोपासक अशा कित्येक ब्राह्मणांस स्वदैवतोपासनावर्धनार्थ जातिहीन असा एक नवीनच पंथ काढण्याची अवश्यकता भासली. तोच हा महानुभाव किंवा अपभ्रंशानें मानभाव पंथ होय. लिंगायत पंथ निघाल्यावर थोड्याच कालानें हा कृष्णोपासक व दत्तोपासक पंथ निघाला. महाराष्ट्रांत किंवा हिंदुस्थानांत जे अनेक जातिहीन पंथ आहेत त्यापैकींच हाहि एक असल्यानें व ह्या पंथाचा प्रारंभ साडेसहाशे वर्षांच्या पलीकडील नसल्यानें, एका जातिहीन हिंदुधर्मपंथाचा आद्यन्त इतिहास तपशीलवार समजला असतां, तो स्वदेशांतील विचारी लोकांस फारच विचारणीय होतो. धर्मदृष्ट्या ह्या पंथाचें माहात्म्य हें असें आहे.

३. हें दोन्हीं प्रकारचें माहात्म्य लक्षांत आणून इतर ग्रंथांबरोबर मानभावी ग्रंथांचाहि शोध केला. शोधून काढिलेल्या ग्रंथांपैकीं जुन्या मानभावी काव्यांचा मासला ह्मणून खालील काव्य छापलें जात आहे. ह्या काव्याचा कर्ता कोण तें माहीत नाहीं. काव्याचे पहिले १७ $\frac{१}{२}$ श्लोक व शेवटले दहा पांच श्लोक नाहींत. काव्यांत चक्रधर व तच्छिष्य

नागदेवभट्ट ह्यांचा उल्लेख आहे. नागदेवभट्ट हा महानुभावांचा ब्राह्मण आचार्य शक ११९८त जन्मला. हा पन्नास किंवा साठ वर्षे वाचला असें धरलें तर ह्याची एकंदर हयात शक ११९८ पासून शक १२०८ किंवा १२१८पर्यंत असावी असें दिसतें. नागदेवभट्टाच्या पुतण्याची हयात, दरपिढी तीस वर्षांची धरली तर, शक ११८८ पासून शक १२४८ पर्यंत असावी असें दिसतें. अर्थात् नागदेवभट्टाचा पुतण्या कवीश्वर शक १२१८च्या सुमारास ग्रंथलेखनास लागला असावा. शक १२४८ पर्यंत कवीश्वर होता असें वर अनुमान केलें आहे. तें अनुमान जर खरें असेल तर प्रस्तुत अपूर्ण काव्य शक १२४८ च्या सुमाराचें असावें असा तर्क होतो. ह्या काव्याचा कर्ता खुद्द कवीश्वर जर नसेल तर तत्कालीन कोणी तरी कवी असावा.

४. ह्या काव्यांत स्रग्धरा, शार्दूलविक्रीडित, मालिनी वगैरे गणवृत्तें आहेत, व बऱ्याच श्लोकांत अंत्य यमक नाहींत. ह्मणजे संस्कृताप्रमाणें ह्या काव्यांतील बरीच कविता निर्यमक आहे. रामदास, वामन, विठ्ठल ह्यांनीं गणवृत्तें मराठींत प्रथम सुरू केलीं असा सार्वत्रिक समज आहे. हा समज, शक १२४८च्या सुमाराचें हें काव्य पाहून, टाकून देणें भाग आहे. विष्णुशास्त्री चिपळोणकर ह्मणतात त्याप्रमाणें श्लोकबद्ध काव्यरचना वामन व विठ्ठल ह्यांच्या आधीं महाराष्ट्रांत प्रचलित होती; इतकेंच कीं यमकप्रचुर रचना प्रकर्षानें करण्याचा प्रघात वामनादि मंडळीनें पाडला.

५. ह्या काव्याची भाषा ज्ञानेश्वरीच्या भाषेहून अर्वाचीन आहे ह्मणजे ज्ञानेश्वरीनंतर तीस चाळीस वर्षांनीं हें काव्य लिहिलें गेलें. ह्या काव्यांत फारशी शब्द एकहि नाहीं.

६. ज्ञानेश्वरीच्या भाषेचें निर्वचन करतांना ह्या काव्याचा उपयोग करून घेण्याचा विचार आहे.

––––⌣––ऱ्हदि धरुनि सवा दैव भावीति देवा ॥
ऐसें जाणौनि शौरी त्यजितु वन वरी राधिके गोपनारी ॥ १८ ॥
पांता श्रीकृष्णराणा शशधरकिरणा व्याकुळा कामबाणा ।
चैतन्यें धुक्ष्यमाणें हरिहररमणें जर्जरें दीनवाणें ॥
दैवें गोविंद पांतां रमण अवचितां देखिला भावभूता ।
तेथें आनंद जाला सुखकर सकळा वल्लभें गोपबाळा ॥ १९ ॥
गोविंदें गोपिकांतें प्रमुदित निरुते पाववीलें सुखातें ।
कंदर्पाचा विहारी रुचिरबनकरी यामिनीसंघसारी ॥
रामू साजात्य वेधी अजितानिरवधी जातिवैजात्य वेधी ।
गोपाळामाजि रासा विहरत सरसा दे हरी वेठि कंसा ॥ २० ॥
अक्रूरा भोजराजा करवि बळ अजा आणवी गूढ वोजा ।
शौरी चाले सगोपां बळ सहितनृपां मारणा क्रोधदीपां ॥
डांगा पिंडार कोंडें सबळ निजगडे वाणिती पैं पवाडे ।
सिंघें पैं वाति वादें प्रबळबळमदें गर्जती मेघनादें ॥ २१ ॥
आलें पैं सिंधुतीरा सकुमति कुचरा गाद निर्णेजकारा ।
मारी थापा मुरारी रिंगत मधुपुरी जात शाळेसि शौरी ॥
तेथें कोदंड मोडी नरवर रगडी राखु कोदंड खंडी ।
मार्गे कुब्जा कुरूपा उजरुनि मधुपां योग्य केली सरूपा ॥ २२ ॥
संध्याकाळीं पुरान्तीं वसतु मधुपती मेलिकारीं निशान्तीं ।
आला शौरी रणान्तीं घनघन बरुती भोजवीरासि घाती ॥
मोंडी शुंडाळ दाढा हरि सबळु पुढां मुष्ठिघातीचि बाढा ।
ह्राणे कुंभा उदूढा अरिदळनदृढा मारिला हस्ति गाढा ॥ २३ ॥
रंगा मल्लारि गेला पशुप सह बळा देखिला लोकमाळा ।
ज्या जैसा भाव तैसा हरि दिसतु रसामाजि पैं काळ कंसा ॥
राजा दुर्गाधिरूढू क्षणकसमचद्रू पैं तुरा होत गाढू ।
शौरीची आर्द्र भ्रू रे घडघाडिति वेरें वैरिया भीतिकारें ॥ २४ ॥
आज्ञापी भोजराणा वरुणि कर खुणा मल्लवर्या वदाणा ।
तेथें चाणूर शौरी ह्मणतु हरि हरी थीर राहे रणारी ॥

झोंबी दोघांसि जाली चटचट सुटली भीडतां मल्लचाली ।
चाणूरा मुष्टिकातें धबधब विरुतें मारिलें मुष्टिघातें ॥ २५ ॥
तेथें तो रामु घातें धनधन विरुतें तो शळासी शळातें ।
मारी मालासि एरा बळ हारि कुचरा संगरीं थोरथोरा ॥
गर्ज्जे गोविंद सादें रणरण समदें मेघगंभीरनादें ।
जेथें तो भोज होता चकित अवचिता तेथ गेला दुरंता ॥ २६ ॥
देखौनि भोज शौरी चळचळित करी प्राण सांडी मुरारी ।
कोंपें तैसाचि ह्राला जटयिं धरियला भूतळीं ऊपटीला ॥
हाहाकारू प्रवर्ते अरिवरदाळिर्ते राख पैं बोलती ते ।
होते कंसानुसारी रिपुवरसमरीं मारिले ते मखारी ॥ २७ ॥
फोंडी कारागृहांतें हरि निजजनितें भेटलीं क्षेमभूतें ।
जाली संतोषपूर्णे तनयवरगुणें लाधले मोदराणें ॥
अर्पी गोविंद वीरा स्ववसति मथुरा उग्रसेनातिसारा ।
राज्या संस्था करीतु यदुकुळमुदितू उद्धवा प्रेम देतू ॥ २८ ॥
शौरी पैं उद्धवासी प्रचळतु कळसीं कुब्जिकामंदिरासी ।
तेथें कुब्जा प्रधानासह हरि सुमना पूजिला रम्यमाणा ॥
तेथें रात्रीं मुरारी बहुत मधुपुरीं राहिला केळिकारी ।
घोषीं गोपी अपारा हरिविरह झरा जालिया खेदसारा ॥ २९ ॥
संभाऊ गोपिकांतें मधुपति निरुतें पाठवी उद्धवातें ।
तेणें संभाविलीया हारिविरहलया गोपिका गोकुळीया ॥
तेथौनि मंत्रिराणा प्रचळतु चरणा माधवा नम्रमाणा ।
शौरी यात्रेसि गंता कुरुसमरगता गोपिका वेधु दाता ॥ ३० ॥
विद्याअभ्यास सीरीसहित हरि करी पूर्ण जाला मुरारी ।
पुत्रां पैं काळ नेता त्वरित गुरुमता दक्षिणा दे विधाता ॥
शौरी पैं शंखचूडावध करित फुडा सागरीं कंबुकोडा ।
मागे पुत्रासि माता बळिभुवनगता देवकी पुत्र दाता ॥ ३१ ॥
अक्रूरें निर्विषादें हरिसि यदुमुदें पूजिलें भक्तिवादें ।
देवें अक्रूरसूरा कुरुपतिनगरा पाठवीलें सुसारा ॥

संभावी पांडवांतें मधुवचनरुतें सांगतू कौरवातें ।
सर्वे निर्वैर वर्ता मधुपुरिं निरुता यतु अक्रूर शांता ॥ ३२ ॥
देवस्थापक साधुपाळनरता कैवल्यनाथा गता ।
त्रिब्रह्मप्रमुखादिदैवतमता भक्तानुरागांकिता ॥
चैतन्यागमभूमिलोक विगता शार्दूलविक्रीडितां ॥
लीळा पांडवरक्षणा खळहता श्रीवासुदेवा नमो ॥ ३३ ॥

॥ इति बाळक्रीडा ॥

गेलीया कंसजाया स्वजनकविषयां कांतनाशान्ति सूयां ।
मारिला कंस शौरी अरिदळन करी सांवती मागधारी ॥
थोरू तो चि प्रतापें रणभुवि तळपे मारिले दैत्य झेंपे ।
पक्षीन्द्रा पक्ष झंपा मशकसमकु पा तू तया होसि बापा ॥ ३४ ॥
अस्तिप्राप्तिप्रवादा श्रुत अतिदरदा तो जरासंधु रोदा ।
प्रज्वाळे अग्नि जैसा घृतनिहितरसाज्वाळकल्लोळभासा ॥
बोले पैंजा तिला हें करिन रण-महें भूमि निर्यादवी हे ।
ऐसें जै पान जोडे वसति वन फुडें लागि सेवी नखार्डे ॥ ३५ ॥
सैन्यातें मेळवा रे निबर रणतुरें वाजवा दुंदुभी रे ।
ऐसे सांघे प्रधाना मगधपति दुना आणिली वीरसेना ॥
आले थोरा स्फुराणी अदट भट रणीं रायिके राजधानीं ।
ढाला भाला फरारे तळपत घसरे चातुरंगें बिरारें ॥ ३६ ॥
चौमेरी सैन्य दाटे रविरज झगटे लोपले दिक्पाट ।
नादींवाद्यांत्रजातां श्रवणबधिरतां होत पैं लोकजातां ॥
तेवी साक्षौहिणी रे प्रचळतु मथुरे तो जरासंधु भारें ।
वाद्यांत्रें वाति गाढा करिति वरफुढां भाट कैवार बाढा ॥ ३७ ॥
पांतां डोंळा चितांडा अहितखरबडा चातुरंगा उफाडा ।
उद्दाळे जेथ घोडा सुभट निबरडा हस्तिकिंकारवाडा ॥
भेरीभांकारसूडा करभजरबडा नाचती नाट धेंडा ।
वेढी गांवांस पाडा करि भट-रगडा संगरीं माधवेडा ॥ ३८ ॥

एसें देखौनि गोची जनहरुषमुची वास पाहे नभाची ।
धाडी वैकुंठवासी रथयुग हरिसी दिव्य दिव्यायुधीसी ॥
रामेंसी शौरि बोले करिकुटमुसळें मागधा सैन्य आलें ।
क्रोधें त्या कंपु चाले बळ हरि वहिलें स्यंदनारूढ जाले ॥ ३९ ॥
वृष्णीचा भारु चाले रणतुर सबळें पांचजन्या वरीलें ।
फुंकीलें वृष्णिपाळें खळबळिति बळें मागधाचीं विशाळें ॥
भुं भुं भुं शंखनादें गिरिचय निरुदे कूर्म वाराह खोंदे ।
सैन्या मूर्च्छा विशेखें वसुमति तरखे रुद्र भोगा विरोखे ॥ ४० ॥
ज्याचा दैत्या दरारा चळत सरसरा चालिले ते समोरा ।
वृष्णी कृष्णानुसारा दळिति झरझरा बैरिसैन्यासि घोरा ॥
घे घे जातील धीटा रिपुरण सुभटा बोलती मारि फेंटा ।
हां हां हां पाडि चाटा समर बळकटा तोडि दे घात मोटा ॥ ४१ ॥
कोपें काळाग्नि जाला मगधजगदळा यादवा मोडु केला ।
वीरां विंधौनि बाणीं यदुबळ धरणीं पाडिलें गर्ज्जऊनी ॥
हांका पैं देतु आला जवळि हरिबळा वर्म बोले उखाळा ।
त्याच्या प्रत्युत्तरातें निगदुनि निरुतें शौरिं चाले रणान्ते ॥ ४२ ॥
गर्ज्जे पैं सिंघ हाके मगध पसरके वीज जैसी घनांके ।
गेला सैन्या निजांतु दडदड करितु चातुरू तोरणांतू ॥
दो भारा जुंझ भारी प्रकटत समरीं हाक बोंबांति घेरी ।
जाली झोंबी विशाळा रणमदतुमुळा मागधायादवांला ॥ ४३ ॥
दों सैन्या जुंझ भाके महितळ थरके देखतां काळ शंके ।
तेव्हां तो वृष्णिराणा अरिदळितरणामाजि जुंझी सिहाणा ॥
भूतांतू जेवि भूतां प्रदळन करितां तेवि गोपाळ हंता ।
विंधे बाणीं तिखारीं रिपुवर समरीं दाटगे सैन्य भारी ॥ ४४ ॥
टंकारू कार्मुकाचा रणभटसमचा भेडवी राउळाचा ।
जुंझंती ते कबंधें भडभड वसुधें धावती वृष्णिबंधें ॥
शुंडांळा कुंभभाळें हयरथ कुटिले फूटिलीं पैं सिसाळें ।
रामें सौनंदघातें हळबळकाळितें टीकरी होत भूतें ॥ ४५ ॥

मोदाडी नागशुंडा मुडति कडकडा मोहडें पैं दुफोडां ।
भूपा वीरा वितंडा कुपितफडफडा चाखवी मागधाडा ॥
ऐसे ते दोघ शौरी खवळत समरीं मारिले वैरि घेरी ।
घायीं डाडाति वैरी कसकसित खरी हुंबतां कुंथ भारी ॥ ४६ ॥
हों हों होंकार नादी भडभड निनदी भुंक किंकारशब्दीं ।
फुं फुं फुंकार नादी कडकड निनदी घाय वाजेति भेदी ॥
फें फें फुंकार फुर्रा फरक फरफरा फुर्र बर्रा भरारा ।
काळिंदीरक्तपूरा जळमळितभरा भूतकंकाळभारा ॥ ४७ ॥
सैन्या देखौनि आटू रिपुरणसुभटू यादवां घेत घोंटू ।
क्रोधें कां काळ जैसा करि रणवळसा हांक दे सिंह जैसा ॥
शौरी दंडायुधातें ध्रुवशरधियुतें छेदिलें कार्मुकातें ।
सूता बाणीं तिखारीं मगधपदचरी चालिले हांक मारी ॥ ४८ ॥
सांडौनि राम बाणा झडकरित रणा हाकिला वैरिराणा ।
तो ही तैसांचि मांडे सरसरित उडे कोपला दे सिहाडे ॥
एकैका झोंबती रे कडकडित करें स्वर्गपाताळखोरें ।
त्या दोघां चंड हांके थरथर थडके सर्व भूगोळ शंके ॥ ४९ ॥
दोघें वज्रांग ळाठे अतिबळकुरठे भीडतां थोर ताठे ।
रामें कष्टी सुभट्टा त्रिभुवन अदटा पाडिलें मागधाटा ॥
सोली बांधे सुताडा सबळ तडतडां तोंडि तों दोरखंडा ।
तेव्हां त्यापासु बांधे वरुणिकवसुधे बांधला नागबंधें ॥ ५० ॥
रामा पैं कोपु आला झळफळ मुसळा घावया ऊचळीला ।
घावों हां हां मुरारी ह्मणतु च न मरी सोंडिला सोंड शौरी ॥
ऐसे ते जैत्य वादि स्तवजति सुविदीं वाणिती कीर्तिबंदी ।
रामू कृष्णा—तिशौरे प्रविशति मथुरे वृष्णिवीरी बिरोरें ॥ ५१ ॥
शौरी पैं मागधातें कुवचन विरुतें नोंकिलें थोर होतें ।
त्यांतें तो आठऊनी बहु झुरतु मनीं फांर पैं दैन्य मानीं ॥
लज्जा तो दंडपाणी प्रविशतु गहनी काननी पैं निराणी ।
मंत्री पैं तेथ गेले गिवसुनि वहिलें मागधा काढियेलें ॥ ५२ ॥

संभावीला सुनीती सुकविमनुकृती बोधिला राजनीती ।
त्यातें नेलें पुरासी प्रबळनयवशी वैदुरी धामराशी ॥
राजे पैं मेळवीले पुनरपि वहिले मागधें जुंझ केलें ।
शौरी पैं मारिले ते सकलदळशतें मोडिलें मागधातें ॥ ९३ ॥
धाडी पैं सर्प कुंभा हरि रिपुरुषभा मुंगिया तेथ लंभा ।
धाडी घालूनि अंते हरि मृत अहितें देखिलें यादवीतें ॥
राजा गाऊनि दानें भ्रमिशतकरणें तो गदाघाततानें ।
लागे दुर्गी यदूंचा पडत जळमुचा गाढ गर्ज्जी घनाचा ॥ ९४ ॥
ऐसें देखौनि शौरी बळ महित करी दक्षिणे यान वैरी ।
तेथें मारी सुकाळा रविरुध अचळा भूतळीं पात केला ॥
आला गावां मुगरी तवं मधुनगरी वेढिली पैं महारी ।
देवें मारूनि घातें रिपुदळ निरुतें भंगिलें मागधातें ॥ ९५ ॥

पुरजन यदुराया भेटि आणीति दाया ।
यदुवरजनजाया सर्व वोंवाळिती या ॥
अदट--मगध--कीळा कंसचाणूरकाळा ।
असुरचयनिदाळा गोपिनाथा नमोस्तु ॥ ९६ ॥

॥ एवं जरासंध पराभव ॥

ऐसा तो नयमंत्रकार्यसुमना ये मागधु पत्तना ।
राया तो विजिगीषु तेविस गणा अक्षौहिणींसीं रणा ॥
आला तो मथुरे यदूसह सळें तैं एकलव्या बळें ।
मारीलें मगधा हरी पळविलें संग्रामरंगीं बळें ॥ ९७ ॥
ऐसा तो दशसप्तवार विकळा शौरी रणीं भंगिला ।
रुद्रातें विनवी महाव्रतकळा तेणें वरू दीधला ॥
कैळासाधिप---दत्त--सद्वरबळें चाले तदा कासिलें ।
कृष्णेंसी यवनाधिपें सुतुमुळें ज्या नारदें प्रेसिलें ॥ ९८ ॥
निद्रावेष्टितमाथुरा हरिजना नेलें सदानंदना ।
श्रीमद्द्वारवतीपुराहसदना सौवर्णभूसद्मना ॥

आला म्लेच्छपती हरी मग पळे पैं पर्वतासी बळें ।
तेथें तो मुचुकुंद नेत्रअनळें पैं भस्म जाला हळें ॥ ५९ ॥
शौरी तो मुचुकुंद सद्गतिगता पैं पाववीला मता ।
म्लेच्छा सैन्य तदा रणीं हळधृता ते मारिलें काळता ॥
आले ते बळदेवकृष्ण मथुरे मारूनि वैरी खरे ।
पांती ते जवं पश्चिमे बहुतरें देखेति सैन्यें परें ॥ ६० ॥
शौरी झुंकतु रामुरुद्रवचनीं पैं मागधा देखुनी ।
वेंघे पर्वत रामयुक्तदहनीं जाळी तया वेढुनी ॥
शौरी रामु न भोगिती यदुपुरा गेला यशेंसी वरा ।
— — — ‿‿ — ‿ — ‿‿‿ — — — ‿ — — ‿ — ॥६१॥
शौरी द्वारवतीसि राज्य करितां श्रीरेवतीयोषितां ।
आली तें प्रणिली हळी विधियुता कालिंदियें भेदिता ॥
देवा तें श्रुतदेव विप्र मिथिले पूजी यथा गोकुलें ।
तेथें पैं जनकें हरीसि विमळें पैं यादवां पूजिलें ॥ ६२ ॥
पार्था सेतुनिभंजनी हनुमता दर्प्पासि तो हारिता ।
धर्मा दर्प्प हरीत भूमि वसता नक्रासुरा घातिता ॥
व्यासा दर्प्पु हरी हरी यदुरुषी मार्कंडदर्प्पा दुषी ।
भीमा दर्पु हरी तमोहन वशी कंदर्पदर्प्पा मुषी ॥ ६३ ॥
शौरी पैं तुळसी प्रणूनि गहनी पैं मूचवीली वनीं ।
जे वृंदागतजान्मिची सुदहनी लावण्य वृंदावनी ।
देवें पैं जनकासि बोध दिधला गर्भीं शुकू वेंधिला ।
बोधीले विदुरासि कोमळकळा कुंतीसि दे सावळा ॥ ६४ ॥
विद्या संजययोगियासि दिधली अंधा रुषी कौशळी ।
देवातें सुर मानवी मुनिकुळीं संस्ताविलें गोकुळीं ॥
गोविंदें शिशुपाळ बाळकपणीं पैं पाहिला जाऊनी ।
झांके नेत्र तयां तिजाचि जननी अभ्यर्थिलें ते वनी ॥ ६५ ॥
सांघे नारद रुक्मिणीगुणकळा तेणें हरी तोखला ।
बोले सुंदर योग्य तें चि अबळा तुझा हरी कोमळा ॥

तेथें किन्नर गात मंजुळ रवें कल्याण कीर्तीसवें ।
वासें भूषण वस्तुजात बरवें त्या दीधलें केशवें ॥ ६६ ॥
सकल विषय बंदीं हिंडतां किन्नरादि ।
हरिगुणगणमोदी मंगळा धामदादी ॥
विहगसहित रंभा भाट ये पैं विदर्भा ।
नरवरकुळशोभा भीमराजेंद्रदर्भा ॥ ६७ ॥

॥ एवं द्वारकाप्रवेश ॥

वैदर्भाधिपकिन्नरा गुणवरा पूसे कुमारी वरा ।
सांघे किन्नरु भूतळीं नृपवरा कीर्तीकुळें चातुरा ॥
अंगा वंगकळिंगमागधभुवां पैं चौंडगौंडा नवां ।
पांचाळा कुरुकैकयामरुभुवां पैं नैषधाराघवां ॥ ६८ ॥
आभीरा कुशसोरठा रणवटां कांबोजचीनाभुटां ।
बाल्हीका नडगुर्ज्जरा घनवटां कार्णाट आंध्रा नटां ॥
काश्मीरा मधुमाळवां पुरुमसा पैं पांडुतुंडां दशा ।
कौशांबा करहाटसैंधक रुषा पैं दंडका वेतसा ॥ ६९ ॥
वैदर्भराज कुळभूतळभूमिपाळा ।
अंकाधिरूढतनया मळलोकपाळा ॥
श्रोता विदर्भतनयादरहीनहेळा ।
जाणौनि किन्नरकळाविद नेत्रलीळा ॥ ७० ॥
श्रीद्वारकानगरमंगळधामगेहीं ।
शोभे मनोहरसुकांचनभूसमूहीं ॥
गोविंद तेथ मधुमाधवराजलीळा ।
राजा अशेषनरदेवसुराधिपाळा ॥ ७१ ॥
श्रीकृष्णें असुरा भयासुरघना गाढेपणें दुर्ज्जना ।
केला घातु हटें कुठारघटना कोदंडकांडारणा ॥
ब्रह्मांडाधिप देवरक्षणघटा पाषांडमार्गावटां ।
दंडादंडन दंडपाणि सुभटा तातंड फेडा धटां ॥ ७२ ॥

कांती चंदनचंद्रकांतिवदना लावण्यलक्ष्मीवना ।
कांती दिव्यकळापकंठकळनासौंदर्यशोभागुणा ॥
शोभे लक्षणलक्षणा वरगुणी चातुर्यचिंतामणी ।
दाता दानमहापदा गुणामणी भूपाळचूडामणी ॥ ७३ ॥
दैत्या दारणचक्र शोभत करीं कौमोदिकी श्रीहरी
भुंभुंभुंकृत पांचजन्य समरीं जो त्रासिता पैं अरी ॥
शोभे नंदकखड्ग उज्वळ घनी जैसी चि सौदामिनी ।
शोभे सुंदर पुंडरीकरमणी तुंडोपहासावनी ॥ ७४ ॥
टंकाराख शत्रुजीव मुषितें कोदंड सारंग तें ।
शोभे पैं वनमाळिका गळगतें जे वैजयंती रुतें ॥
शोभे कौस्तुभमुक्तरागरचना हारावळीकांचना ।
कर्णीं कुंडल माजयुग्म रसना चूडा हरीशोभना ॥ ७५ ॥
वासें वेढित सुंदरें रुचिरें जे दिव्य पीतांबरें ।
ज्याचा दिव्य रथीं बळाकु बिचरें सुग्रीव घोडा तुरें ॥
सैन्यु वर्तत मेघपुष्परसना ह्रिंकारकाळा रणा ।
शोभे ज्या गरुडध्वजी घनघना ज्या पक्षझंपाटणा ॥ ७६ ॥
ऐसा तो हरि वेद नेणति जया वाणू रुषी धीर या ।
शेषाहिप्रमुखा सुरा सुरवयां पैं कोण जाणे तया ॥
राया तो हरिवल्लभू गुणमणी पैं योग्य ये रुक्मिणी ।
नाहीं आन दुजा कदापि धरणी लावण्यचूडामणी ॥ ७७ ॥
ऐसा किन्नरु शौरिकीर्ति अबळा वाणी हरी सांवळा ।
त्या दे त्यागु अनर्घ्य भीमु सकळा भांडार देशां बळा ॥
ते गेले मग भीम बोलतु सभे ये रुक्मिणी वल्लभे ।
द्यावें माधवपाळका तवं रभे हुंकार रुक्मी सुभे ॥ ७८ ॥
डोळे रक्त करूनियां थरथरा कांपेति कोपें खरा ।
रुक्मी गर्जतु उत्तरी खडतरा गोपाळ तो माजिरा ॥
घोषीं गोपवधू सदा व्यभिचरे काळातिरूपें धरे ।
धाके मागधपाळका दरदरें रीगे समुद्रांतरें ॥ ७९ ॥

वेडा जल्पतु विप्र किन्नरपणें दाना सदा ठेंगणें ।
जाने काइं उदार पौरुषखुणे जो देतयां तू ह्मणे ॥
वंशे शुद्ध कुळें नसे नृपधरे ज्याचा प्रतापा पुरे ।
ऐसा तो शिशुपाळ नोवर वरे ये रुक्मिणी सुंदरे ॥ ८० ॥
भीमें पुत्रभिडे सभे ह्मणितलें तें पाहिजे नुष्टिलें ।
तेणें चैद्यपतीसि वाड़वकुळें पैं मूळ हो धाडिलें ॥
वैदर्भी निजमंदिरा सहचरी गेली महा दुःकरी ।
पावौनि विरहानळा हरि-हरीसंयोग भावी करी ॥ ८१ ॥
जाणौनि विरहासि भावकळना दामोदरा सूचना ।
धारासीतळता करी सुहृहना नेली तया तीगुणा ॥
तेथें तीसि सुखा न ये मग पुसे देवी स्वभावावशें ।
सांघे कृष्ण मिळैल दैवलवशें जीवा घडे संवशें ॥ ८२ ॥
पाचारी द्विजराज भावकळिका त्या मानु दे पैं निका ।
देवी क्षेम पुसे प्रधानबटुका सांघे तया कासिका ॥
संतोषें द्विजराज भीमदुहिते गोविंदवेधांकितें ।
देवा आणिन चौ दिसा चि निरुतें निभ्रांत जाणै सुते ॥ ८३ ॥
गेला तो द्विजराज यादवपुरा श्रीकृष्णनाथा वरा ।
भेटे वंदितपादपद्ममधुरा वाणी वदे संवरा ॥
अर्ची त्या द्विजनायका सुरगुरू एकान्त मागे परू ।
दे तो त्या विनती करी द्विजवरू वाची गिरे गोचरू ॥ ८४ ॥
श्रीमन्मंगळमूर्ति माधववरा श्रीकृष्णनाथा परा ।
पादांभोरुहकिंकरे पटुतरा अभ्यर्थना संवरा ॥
वैदर्भिप्रणये प्रणाम बहुधा साष्टांगपांती बुधा ।
लावण्यामृतचंद्रचंदनविधा मी लब्ध जी कामधा ॥ ८५ ॥
श्रीकिन्नरें तवं कथा कथितां सुगाथा ।
ते कर्णरंध्र सुरथा मम वृष्णिनाथा ॥
त्या लाविलें तवं पथा मन मे अनाथा ।
ने सर्वथा मज रथा न हि चेदसूथा ॥ ८६ ॥

आराधनाधनधनागमलभ्य तू जी ।
जन्मी सती सकळजीवितदान मी जी ॥
देईन मी तुज चि जीवनजीवना जी ।
जानै अनन्यशरणांगत किंकरी जी ॥ ८७ ॥
गोविंद आर्त्तजनचातकमेघलीळा ।
हे योगिवाणिविफळा न करी सुशीळा ॥
सांडीन किंबहु तवागमलोकहीना ।
या जीविता हरि मना तुज ये तदी ना ॥ ८८ ॥
केलें तवेश पितरें मज दान येरें ।
भावें निषेधुनि शरें वचनें प्रघोरें ॥
चैद्यासि मानित वरें तुज लाज पारे ।
कंठीरवा बळि हरे जरि फेरु सारें ॥ ८९ ॥
मंदाक्रांता विरहदळिता स्वामि तू रक्ष आतां ।
मातें नेता स्वचरणगता होसि तू सर्ववेत्ता ॥
देवाधीशा सकळकळशा केवळा केशवेशा ।
भावानाशा सदयपुरुषा माधवा माधवेशा ॥ ९० ॥
यदुकुळप्रतिभाषी वाचिलें पत्रिकेशी ।
हरि समय तयासी पूसतू विप्र भाषी ॥
करदळचय पोळे अंग दावाग्नि जाळे ।
लवकरि हरि बोले पाहिजे तेथ गेले ॥ ९१ ॥
शौरी दारुक योजिता रथवरा आरूढ चाले तुरा ।
कोण्हासी चि न जाणता सरसरा संगें-सुदेवा वरा ॥
घोषें वाजति किंकिणी घणघणा शौरीरथा चाळना ।
वेगां सागरतीर लंघितवना द्रोणी बहू योजना ॥ ९२ ॥
होते हेर समैं तिये हळधरा सांगेति विश्वेश्वरा ।
याना जाणुनियां नृपा यदुवरा संभाउनी ते त्वरा ॥
चाले आहुक मूसळी निजदळें मागें तदा भूतळें ।
भारी भंजित कूर्मदाढ सकळें पैं कांपविलें बळें ॥ ९३ ॥

टाकूनीं मधुमाधवा झडकरी ते भेटले श्रीहरी ।
बोले राम भलें बिजें कृत हरीलागौनियां नोवरी ॥
शौरी आहुकरामयादवबळें पीढी नदी पातले ।
वैदर्भीकुशळा द्विजासि वहिलें देवें पुढें धाडिलें ॥ ९४ ॥
आनंदें द्विज जात ऊभुनि गुढी दैत्या नृपाची वढी ।
सैन्यें ते न समाति भूतळमढी देखे दुनी देव्हढी ॥
गेला रुक्मिणिमंदिरा द्विज जवें घेऊनि गूढी सवें ।
आला विप्र गुढी करी सखि लवे माये सजीवें रवें ॥ ९५ ॥
द्वारस्था पद पैं द्विजा नृपसुता वंदी सुखाल्हादिता ।
बाष्पा गद्गदकंठ संपुळकिता आनंदलाभांर्ज्जिता ॥
सांघे विप्र तिये तदा नृपसुते येथें हरू वों रुतें ।
आला दैत्यकराळकाळ नविते सौभागिनी देवते ॥ ९६ ॥
वैदर्भी कुशळा ह्मणे द्विजवरा तूं जीवदाता परा ।
आतां किंबहुना ह्मणौनि चतुरा लागे पदी भूसुरा ॥
घोडे भूषण वस्तुजात लुगडी विप्रासि दे ते फुंडी ।
लागे पैं चरणा द्विजा घडिघडी प्रेमादरां वाकडी ॥ ९७ ॥
देवी पैं ककुदाधिरूढमुखरा बोले द्विजा श्रीधरा ।
वेगां पैं मज दावि दावि चतुरा मुद्रांकिता सुंदरा ॥
तेथें विप्र सुदेव सुंदर गिरा बोलौनि दावी धुरा ।
रामा आहुक उद्धवार्ज्जुनवरा चिन्ही निजा विस्फुरा ॥ ९८ ॥

शोभे विहंगपति कांचनवर्णधामा ।
रत्नध्वजि स्फुरित हारितपिच्छ वामा ॥
पिच्छाळि नीळ मधुमाधवराजि--रोमा ।
तो वैनतेयखग देख विशाळधामा ॥ ९९ ॥
श्रीकांत तेथ ककुदी अधिरूढ पाही ।
सीतांशु चामर पदी विजिजे सुरांही ॥
पीतांशुकेतु बिशदी कळशी ध्रुवाही ।
छत्रातळी घनपदी घननीळदेही ॥ १०० ॥

वैदर्भराजदुहिता प्रणमूनि कांता ।
घालू रथीं चि तुकिता धरिली द्विजाता ॥
कौलीनकर्म करितां अपवाद होतां ।
ऐसें झणें करि गतागत कार्य होता ॥ १०१ ॥

वैदर्भाधिप माधवा झडकरी भेटी निगे श्रीहरी ।
क्षेमाळिंगन दे तया नरहरी भीमु स्तवी सद्गिरी ॥
पूसे माधव राजया स्थळ निकें वस्तीसि तो अंबिके ।
सांघे यादवसैन्य तथ असिकें पैं उत्तरें साटके ॥ १०२ ॥

पाठी ब्राह्मण रुक्मिणी रुखवता देऊनि धाडी नुता ।
धाडीले परिचारिका द्विजसुता तो होय आरोगिता ॥
जाली भोवरि यादवासि सकळा देवें विडा घेतला ।
सर्वा देउनिया वधूहतिकळा विप्रा पुसे सांवळा ॥ १०३ ॥

सांघे विप्र कळा हरी निज दळें बीजें करा पाहिलें ।
होत होइल अंबिकेसि वहिलें येणें विदर्भी भलें ॥
पाठी श्रीहरि रुक्मिणी जनिहरा रायाजि नावें परा ।
विप्रा मानवला हरी हय तुंरी दे वस्तुजातां बरा ॥ १०४ ॥

आज्ञा घेउनि मंदिरा द्विज निगे देवीचयां सानुगे ।
आरोगी पतिचा प्रसाद सुभगें पैं रुक्मिणी सामगें ॥
निंद्रा भीमकिये न ये निशिभरी एरीकडे श्रीहरी ।
पाचारूनि दळाधिपा झडकरी आयींति सांघे करी ॥ १०५ ॥

रात्री मागधु रुक्मिया पुसतसे हा कृष्ण आला असे ।
का ह्यां बोलत रुक्मिया कुहवशें हा धीट आला असे ॥
निंद्राभूत झनी हुवाल सुभटा पैं यादवां राणटा ।
गोपां अंभनका धरू बळकटा मारा बळें सानटा ॥ १०६ ॥

पाठी पैं मधुमाधवी चि सबळें तें सैन्य पाळानिलें ।
वाद्यें वाजति वैरिमानसदळें वृष्णी महा गर्ज्जले ॥
पाताळांबरभूतळे गिरिदरे वेळे तिये घंभरे ।
वृष्णिध्वानितवाद्यवादनभरें गंभीरधीरें खरें ॥ १०७ ॥

घेरी वाजति दुंदुभी धमधमा भांकार भेरी धुमा ।
घांघाळा तुररी वळें धिमिधिमा सिंघें तुरें.डिंडिमा ॥
बाजेती घन तांबकी घणघणा घंटा गजा ढंढणा ।
भुंभुंभुंकृत शंख पैं झणझणा त्या जेगटा दारुणा ॥ १०८ ॥
कासोळी रणवेणु मांदळ खुळा भोंमोहरी काहळा ।
डौंडी ढोल सुबोंबडी सुटिवळा गिड्डी हुडुक्का दळा ॥
शौरी फुंकित पांचजन्य सवळे पक्षी कपी गर्ज्जले ।
पार्थू फुंकित देवदत्त तुमुळें तेणें अरी कोपले ॥ १०९ ॥
तेथें सांघति मागधा चर वळे जी वृष्णि पाळानले ।
तेथें हूलि पडे नृपा खळबळे सैन्यासि भै वर्त्तलें ॥
राजे माधवपाळका चळचळा कांपेति पैं दुश्चळा ।
आला कृष्णु परस्परें फळफळा आळोंचिती ते पळा ॥ ११० ॥
वृष्णी अंधक भोजकां चपरडे कोसांत्वतां पैं पडे ।
जुंझी ऊडति जुंझतां झपरडे गाढा दळाचे फुडे ॥
दाशार्हा मधुकुक्कुरां दड फडे गुंडांसि साळा उडे ।
खांडे अर्बुद माथुरा कडकडे बाणा पटंगा झडे ॥ १११ ॥
कैचा हा शिशुपाळु नोवरु फुडा घातासि हो बापुडा ।
जाला राजदळा नव्हे धडफुडा झुंकेल आधी कुडा ॥
चांडाळें नचलों परी अतिबळें थोताउनी आणिलें ।
गावां जाउनि कैसया परि खळें काळापुढें घातलें ॥ ११२ ॥
आम्हां मागधवीर चांग करडा त्या गर्व गेला फुडा ।
केला पैं दश सात वेळ रगडा यांचा रणी रोकडा ॥
ए वेळे जरि वाचलों तरि कदा कोठें न जावों सदा ।
गावीं बाइल वाट पाहिल मुदा आम्हासि हे आपदा ॥ ११३ ॥
तेथें मागधु शाल्वपौंड्रकबळी चैद्यादिराजे दळी ।
राया जे करडे भयासुर फळी शस्त्री महा दुश्चळी ॥
हो रे हो म्हणती धरा धिर रणी वीरासि पाचारुनि ।
जाले सावध वीर दुंदुभि घनी आस्फाळिले तत्क्षणी ॥ ११४ ॥

आले हेर जरासुतासि कथिती आनीक शीघ्रा गती ।
जी जी एथुनि जातुसे यदुपती द्वारावतीये प्रती ॥
पाठी आनिक हेर सांघति तया जी दीढ गावें रयां ।
गेले यादव पैं निंभे मग तयां जालें भलें राजयां ॥ ११५ ॥
बोले मागधु राजयां यदुपती एऊनि गेला कृती ।
हें आह्मां न कळे पुढां ग्रहगती होईल कैसी स्थिती ॥
पूसे भीमकपुत्र एउनि नृपां हें वर्त्तलें कायिं पां ।
सांघे मागधु रुक्मियां विवर पां वृष्णीमता सांघ पां ॥ ११६ ॥
रुक्मी बोलतु मागधा मधुपती भेऊनि गेला कृती ।
तो जी राणट्ठु गोवळू रणगती पैं कायिं जाने धृती ॥
ऐसा ही जरि गोवळेनि बरळें जुंझा रणी कासिलें ।
त्यातें मी पळवीन जी निजदळें बालौनि ऐसें चले ॥ ११७ ॥
श्रीउग्रसेनयुत यादवभार गेले ।
श्रीकृष्ण राम तिघ अर्ज्जुन तेथ ठेले ॥
आच्छादुनी निजटके बहु लीन जाले ।
अंबाळयां चरम बाह्य पदींद्रुमूळें ॥ ११८ ॥
सूर्योदयीं द्विज निबोधित भीमपुत्री ।
यां त्रैंबिके निजगता पुसिलें जनित्री ॥
वैदर्भराजतिलका निगदी सवित्रीं ।
राजेनिया चि विधितें पुसिला सुमंत्री ॥ ११९ ॥
मंत्री ह्मणे नरपती जवं एथ नाही ।
रुक्मीकुमार झडती तवं काज पांही ॥
होईल हें नरपतीकुमरीसि लाही ।
जी पांठवा दळपती दळौवे सवें ही ॥ १२० ॥
वैदर्भराजसुभटा रणरंगधीरा ।
मत्तायिता गजघटा नरदेववीरा ॥
धाडी सवें घनवटा कुळजा कुमारा ।
भाऊसरादि अदटा दळित प्रवीरा ॥ १२१ ॥

एरीकडे वरपदी दमघोषु राजा ।
आयीति पैं करि सदी कमनीयवोजा ॥
वैदर्भिये वरमुदी घनसारतेजा ।
सेलावरोध सुपदी प्रयुजी सपूजा ॥ १२२ ॥
राजा विदूरथ जरासुत भौमबाणु ।
काशीश्वरू करुष शौभपती प्रवीणु ॥
पैं दंतवक्र मुर बल्वल पीटगाणू ।
कालिंग पौंड्रक सभासद एति वेणू ॥ १२३ ॥
ऐसा होतु महा घमंडु सकळा वैवाहिके सोहळा ।
बोले भीमकु रुक्मिणीसि वहिला न्या अंबिके संकुळा ॥
पाळाणौनि दळाधिपादिश रणी पैं दोनि अक्षौहिणी ।
हस्ती गूढर घातले हयगणी ते वाति वाद्यें घनी ॥ १३४ ॥
सांघे पैं सखियासि भावकळना वेगां करा चाळना ।
उह्लिंगें प्रकळीति चंद्रवदना त्या सादरा सद्गणा ॥
वैदर्भी कळधौतरत्नकळसी संमार्जिली उन्निशी ।
काळी सौधगृही विधान सुवशी साध्वी पुरंध्री वशी ॥ १२९ ॥
कासी सेला सुकासे अतिधवळ कृशे मेखळा हंस कासे ।
गाढी मंजीर पादीं नवकरजपदीं मुद्रिका रत्नमोदी ॥
मुक्तें घाली गळांगी पदकठि कलगी कुंडलें कर्णभागीं ।
शोभे भासा कपोळी प्रचळत युगुळी गुच्छ कर्णी झळाळी ॥ १२६ ॥
देवीहस्तारविंदी रुचिसरळ मुदी कंकणे हीरवृंदी ।
देवीपादारविंदी मिरवत सुमुदी तूळ नूपूरमोदी ॥
चाले हंसागतीतें रुणझुण विरुतें देवके अंबिकेतें ।
माळा हातीं दळातें यदुवरदयितें देखती वीरकांते ॥ १२७॥
देखौनी भीमबाळी मदनशरदळी विंधिलें भावकीळीं ।
शस्त्रें त्यांची गळाली त्रपित पळपळी मानवें भ्रांत जाली ॥
देवी देवेश मोदें प्रमुदितसुन्हृदें पातली अंबिकें दें ।
तीतें पूजी प्रमोदें सुरभिमृगमदें गंधधूपादिचंदें ॥ १२८ ॥

देवीभूषांबराळा द्विजरुपि अवळा वाण दे दानलीळा ।
देती आशीर्विशाळा भवदरिमहिळा आमचा पुण्यमोळा ॥
देवी यांत्राविधाना करुनि चुळ मना अंबिके बाह्य वाणा ।
आली पैं विप्रयुक्ता तवं दरि निरुता देखिला तेथ होता॥ १२९॥
बोले शौरी द्विजाता हरि निज जनिता हे हरावी महंता ।
ऐसे बोलौनि गेला द्विज सहसकळा कुंडना पैं निजाळा ॥
शौरी नोदी रथातें जनिकरकळिते वाइली स्यंदनी तें ।
गोविंदा भीमबाळी प्रमुदित सकळी रुक्मिणी माळ घाली॥ १३०॥
सुखरनरकोटी देवता पैं वधूटी ।
शरगिरिदिनदाटी वर्षती पुष्पवृष्टी ॥
ऋषिमुनिवनचारी अंतराळी विहारी ।
अतिनिगमविचारी वाणिती पैं मुरारी ॥ १३१ ॥
सचिवगण सुगीती गाति विद्याधरांती ।
यदुपतिसमयांती अप्सरानाच होती ॥
धमधमधमनादी दुंदभी देव वादी ।
धिमिधिमिधिमिनादी मौरजा वाद्य वादी ॥ १३२ ॥
जयजयजयकारी वर्णिती पैं मुरारी ।
सुरनरमुनिसूरी मेघगंभीरवीरी ॥
यदुपति-सुरमाळालोकनानंद केला ।
प्रकटित वर हेळा देवता दिव्य लीळा ॥ १३३ ॥
स्फुरउनि निज शंखा बोलिला शौरि देखा ।
घडघडित रणांचा मेघगंभीरवाचा ॥
जनि हरुनि निनूहें आइका वीर हो हें ।
जरि बळ तुमतें तें सोडवा रुक्मिणीतें ॥ १३४ ॥
विहगनृपतिकेतू माधवामाजि जातू ।
हळधरकपिकेतू राहिले पैं रणांतू ॥
सुभट सुभट पंथा वेढिलें रामपार्था ।
घडघड रणमाथां गर्ज्जती मेघ गाथा ॥ १३५ ॥

मिळउनि रणधीरा वर्षती शस्त्रधारा ।
तळपत शरपूरा हाणती युग्मवीरा ॥
घडघडित विशाळें आणि शस्त्रें विलाळें ।
कडकडित कराळें विद्युतास्त्रें शिखाळें ॥ १३६ ॥
हळधर रणमोदें गर्ज्जेला सिंहनादें ।
रगडित रिपुवृंदें पीठ केली विनोदें ॥
धवळतुरगसादें वाजवी शंखभेदें ।
प्लवगपतिनिनादें भुंकभुंकारशब्दें ॥ १३७ ॥
वरुषत शरधारा पार्थु वैदर्भवीरा ।
विगडित गजभारा बाण जाळीति खारा ॥
रगडित नरवीरा चालिला पायभारा ।
मुगवित असिवारा स्यंदनास्थासि धीरा ॥ १३८ ॥
हरिहय हळपाणी मारिलें सैन्य राणी ।
दळपति मुसऊनी तैं पडे बाण हाणी ॥
नृपति अनुजबाणी वर्षला शस्त्रयोनी ।
घनु थिर निगदौनि गर्ज्जला मेघवाणी ॥ १३९ ॥
हरि हय निज कांडी पैं तयां बाण तोंडी ।
विघडुनि रथ धोंडी मारिली काप खंडी ॥
नरपतिअनुजातें खीळिलें बाणघातें ।
उडउनि शरपातें पाडिलें पैं पुरातें ॥ १४० ॥
हरिहयबळभद्रू शब्द गर्ज्जेति मंद्रू ।
घनरवजयभद्रू कोपला काळरुद्रू ॥
यदुपति निजभारें तेथ आला बिरारें ।
सुरवरजयकारें वाद्यनादें प्रघोरें ॥ १४१ ॥
सचकित रिपुलोका पूसती काइ हांका ।
निगदति हरि हों कां नोवरी नेतु पां कां ॥
मगधपतिनृपाळी आयिकीलें विशाळी ।
गजबज बहू जाली राजयां तेचि काळी ॥ १४२ ॥

नपृ सकळ मिळाले सिंहनादें निगाले ।
न गणित वरि आले यांदवा वेढियेलें ॥
घनघनघननादें मारि घेधेति शब्दें ।
बळिबाळिरवबादें हांकिती वैरिवृंदें ॥ १४३ ॥
अरिवर शरधारी वर्षती शस्त्रपूरी ।
रविकर शर—सारी लोपले पैं रणारी ॥
रणपट—हरिनादें दुंदुभीचे निनादें ।
स्फुटत न्हृदय भेदें अंबरी नाद कोंदे ॥ १४४ ॥
यदुवरपतिसेना बाण जाळी विलीना ।
खिळितु मगधु राणा जुंझवादी प्रवीणा ॥
गगनगतयदूतें त्रासवी शाल्वपातें ।
शरजउपरमातें पावले प्राणकांतें ॥ १४५ ॥
रिपुवरचय ऐसे भीडतां थोर कासे ।
रणमद रणघोषें खीळिलें सैन्य कैसें ॥
यदुपति निजवीरा देतु आज्ञा प्रवीरा ।
समरसमरमारा वैरियां धीरवीरा ॥ १४६ ॥
ऐसे यादववीर लोटति रणा गर्जिन्नले दारुणा ।
हांका देति रणी महाघनघना वाद्या सुटे गाजणा ॥
वीरा हस्तभृतायुधें लखलखा सूर्यासमें पैं उखा ।
कोंदंडें तिर कांपखंड दुमुखा बीटी त्रिगेडी नखा ॥ १४७ ॥
भाले सायक वोडनें रणगदा कुंतें कटारा रदा ।
खड्गें मुद्गल शूळ साबळ गदा चक्रें भुशुंडी कुंदा ॥
कांती दीघळ गोफणा टळहुडी ईटी छुरी तर्वडी ।
दांडे मूशळ दुः कुंठार उफडे पैं कोल चेंडू खडे ॥ १४८ ॥
भाले तोमर कत्रि सूळ परिघा बर्शे चिरे शत्रुघा ।
खांडे अंकुश कातरी करकघा ऊफांग थाटे प्रघा ॥
पूढां वावडले बळी उखरडे काळानुगा सांगडे ।
राया सैन्य विदारिलें धडफुंडे आंधारु तेथें पडे ॥ १४९ ॥

तेथें वीर परस्परें खर रणी बोलेति वर्में उणी ।
बाणी विंधति पाडिताति धरणी वीराशिरें दारुणी ॥
बाणी अंबर दाटलें कडकडा घालीति शस्त्रें तडा ।
अंगी आदळती तिये थडथडा डोळा पडे झांपडा ॥ १९० ॥
तेथें तो बळभद्रवीरु मुशळें झोंडी रिपूचीं दळें ।
कोपें हांकितु मागधा निजबळें ते दोघ हि गर्ज्जेले ॥
बाणी विंधतु पैं जरासुतु तया तो जायें धावौनियां ।
मारी तुंड रथा बळें धरुनियां त्या सारथी घोंडयां ॥ १९१ ॥
हाने घाव दुजा रथा कडकडा मोडी रथू देव्हडा ।
कोपें मूशळु ऊचली धडफुडा हाने तया देव्हडा ॥
तेथें तो मगधेश्वरू पळतुसे भारांतु पैं जातुसे ।
धाकें झांकविला टका दळितसे एरू दळें धापसें ॥ १९२ ॥
विंधे पौंड्रक अर्जुना सणसणा बाणी महादारुणा ।
एरू तोंडित जायें फाल्गुनघना तोंडी रथा पैं दुना ॥
बाणी पौंड्रकु खीळिला मग पळे भारांतु पैं ते व्हेंळे ।
तेथें उद्धववीर मुख्य तुमुळें राजे रणी भंगले ॥ १९३ ॥
तेथें मागध मुख्य पैं नृप सळें गर्ज्जौनियां चालिले ।
घेघेमारि करीत मारित दळें वृष्णीसि ते भीडले ॥
त्यातें यादववीर विंधति बळें घाइ रणी मातले ।
जुंझी वीर अभंग पैं खवळले ते यादवां झोंबले ॥ १९४ ॥
ऐसें देखुनि रुक्मिणी अतिभियां चिंतातुरा वैरियां ।
बोले देखुनि शौरि वृष्णिदळयां जिंकैल ना भी रयां ॥
शौरी चक्र विडाळिलें अरिदळें तोडीत ते चालिले ।
टंकारूनि धनुः स्वहस्तकुशळें त्रासी अरी मातले ॥ १९५ ॥
क्रोधें तो बळभद्रु वोढुनि हळें झोंडी अरी मुशळें ।
तेथें अर्ज्जुनबाणजाळतुमुळें राजे रणी भंगले ॥
ऐसें माधव अर्ज्जुना हळधरा त्या जुंझतां पै धुरा ।
जाला मोड्डु महा रणी नृपवरा ज्या माघधाद्यां वरा ॥ १९२ ॥

हस्ती अश्व उलंडले रथ भले बाणी रणी मोडले ।
नावांचे नरवीर पैं पडिनले लोंढे मृजा लोटले ॥
बारा वाट महाबळीनृपदळें पायीं पळाले भले ।
जातां वाट हि भूलले हुरळले राणें गिरी लंघिले ॥ १५७ ॥
ऐसे जाउनि हेर सांघति नृपा वैदर्भदेशाधिपा ।
तेथें चालतु रुक्मिया अति च पा कल्लोळ अग्नी कुपा ॥
क्रोधें मत्त अनीकिनी दशगुणा सैन्यें निगे तो रणा ।
टाकी यादवसैन्य पै झनझना देखौनि गर्ज्जे वना ॥ १५८ ॥
राहे तू स्थिर गोवळा जनिकळा चोरा सदा मोकळा ।
साहे रे मज रुक्मिया अतिबळा जासील कोठें खळा ॥
ऐसें नोकुनि विंधतु सणसणा बाणी महादारुणा ।
शौरी त्या दशसप्तबाणघटना विंधे रणी खंडना ॥ १५९ ॥
कोदंडध्वजसारथी रथहरी चक्रावकाष्टौ हरी ।
एकैकें चि शरें विदारतु दरी अक्षौहिणी नागरी ॥
रुक्मी वीरथु धावतू पदचरी क्रोधें जवें अंतुरी ।
बोले उद्भट उत्तरी अतिखरी घेऊनि खड्गा करी ॥ १६० ॥
साहे रे मज गोवळा म्हणुनिया प्रेरीतु खड्गा तयां ।
बाणी तोडुनि चक्रपाणि समयां कोदंडकोटीरया ॥
वोढी भीमसुता धरूनि धमनी बांधे ध्वजी ताठुनी ।
माथा काढुनि पांच पाटसरणी नोकी विटंबी रणी ॥ १६१ ॥
कोपें रामु हरीसि भीमकुमरा पैं सोडवी सत्वरा ।
वस्त्रें देउनि पाठवी निजपुरा संबोखिला सद्गिरा ॥
शौरी मंगळदुंदुभी निजपुरा चाले सुखें संवरा ।
पुष्पी वर्षति देवमाधववरा वाद्यैलनादी सुरा ॥ १६२ ॥
चैद्यू तदा नोवरचिन्हहीनू ।
पळौनि गेला उपजातिलीनू ॥
संबोखुनी मागधराज चैद्या —।
देशासि ने पौरुषहानिखिद्या ॥ १६३ ॥

वैदर्भराजा हरि मूळ वोजा ।
धाडी महौजा मुनिराजराजा ॥
वैदर्भ चाले निजसैन्यमेळें ।
हरीसि जालें कुशळातिशीळें ॥ १६४ ॥
द्वारावतीनगर मंगळतूर्यघोषी ।
शौरी प्रवेशतु विदर्भ सुयादवीसी ॥
गर्गादिवर्य रुषि मंगळमंत्रघोषी ।
लावीति लग्न मधुपाळकरुक्मिणीसी ॥ १६५ ॥
आनंदसंभ्रम जगत्रय होत लीळा ।
वैवाहिका परम मंगळ गाति बाळा
स्वर्गी सुरेंद्रमुनिनारद हे चि केळा ।
पाताळवासि फणिराज विरिंचिबाळा ॥ १६६ ॥
सूर्यो दे मणिरत्न तुष्ट तपसा सत्राजिता सद्दशा ।
त्यें लेऊनि वना प्रसेनु महसा मारी हरी दुर्दशा ॥
सिंहा मारुनि जांबवंतु सुमणी ने तेथ गेला रणी ।
जिंके त्या हरि जांबवंतु सुमनी दे जांबवंती वनी ॥ १६७ ॥
क्षाळीतां अभियोग यादव हरी सत्राजिता दुःकरी
गाळी देति कदुत्तरी मनि हरी दे सत्यभामा वरी ॥
शौरी सप्तकडंगरीयकळिका केली बळें काशिका ।
तेथें पैं मधुपासि नाग्न जितिका ते माळ घाली सुका ॥ १६८ ॥
शौरी उज्जयिनी स्वयंवर चरी जिंके नृपा दुःशरी ।
घाली माळ हरीसि मंगळकरी ते मित्रविंदा वरी ॥
राधायंत्र दुवाड भेदुनि हरी तो लक्ष्मणेतें वरी ।
भद्रा अर्पित माळ कंठ समरी भद्रा हरी श्रीहरी ॥ १६९ ॥
काळिंदी प्रणिली हरी सुगहनी पार्थासवें नेउनी ।
मारीले मुरुपीठ दुर्ज्जय रणी प्राग्ज्योतिषा जाउनी ॥
मारी भौमु हरी हरी वरतनू साहस्र सोळा घनू ।
मारी शंबर शौरिपुत्रमदनू जो आनिला चोरुनू ॥ १७० ॥

वैदर्भीकळही प्रियोन्नति उते भामा हरी दान ते ।
देवी प्राखर गर्वहानि तुळंत जाली वधूभूषिते ॥
भामेलागुनि पेरि जातु हरिला प्रद्युम्नभू जन्मला ।
शौरी सागरवारिखेळनकळा प्रेमोदयो दाविला ॥ १७१ ॥
भामासौंदर्यगर्वा सगरुडविरवा धापसी पाणिभावा ।
मोही तो नारदातें प्रकटितु निरुतें ब्रह्मचर्येष्टिकातें ॥
पावी राज्या सुदामा मदनसुत रमा नीत मोचूं सुधामा ।
जृंभाखें शूलपाणी भुलउनि धरणी तोडिले बाण पाणी ॥ १७२ ॥
गेला कोशासि शौरी स्वपद--अनुकरी मारिला पौंड्रकारी ।
पांडीलें काशिराजा शिर हरि सहजा विस्मयो वृष्णिराजा ॥
धाडी सौदक्षिणू ते सुकृति मखकृतें द्वारके अग्निभूतें ।
ते शौरीचक्रभीता दहिनिजनुदिता भस्म काशी समस्ता ॥ १७३ ॥
रामें पैं युद्धलीळा द्विविधु वधिला रुक्मियां घातु केला ।
मारीलें बल्बलातें मुनिजन निरुतें पाववीलें सुखातें ॥
गंगांती कामपाळें कुरुनगर हळें निक्षिपा उच्चटीलें ।
शांबा सांडोनि योषा प्रणत गतरुषा देतु दुर्योधनूषा ॥ १७४ ॥
अक्रूर आज्ञापित सत्युधाना ।
सत्राजिता मारितु वृष्णिराणा ॥
मारी तयां एरु मुनींद्रनेता ।
संबोखिता त्या हरि होयें होता ॥ १७५ ॥
गोविंदें दैवभूता जतुगृह दहता रक्षिलें पांडुपोतां ।
पांता पांचाळदेशी जनिहरणरसी भेटला पांडवासी ॥
त्या अर्धे राज्य जालें मग हरि वहिलें खांडवप्रस्थ केलें ।
स्वर्गा सामान्य शौरी निगतु यदुवरी द्वारके पैं मुरारी ॥ १७६ ॥
छेदी सौभद्रहस्तां हरि जठरगता दांगविलासकर्ता ।
वज्रा आऊठ योगें सुरयुवति निगे स्वर्गलोकासदंगें ॥
क्षीराब्धी पार्थयोगें गतु हरि सुभगें वंदिला सानुरागें ।
लक्ष्मीनारायणें तो द्विजसुतहरि तो साज्र्जुनू कृष्णु देतो ॥ १७७ ॥

पार्थेसी देवराणा प्रचळतु गहना खांडवां दानदूना ।
देता तो पैं मुरारी शिखि दहन करी खांडवां भस्म भूरी ॥
इंद्रेंसी युद्ध जालें मग हरि वहिलें द्वारके यान केलें ।
गोविंदा राजसूया कुरुपतिसमयां नेतुसे वृष्णिवर्य्या ॥ १७८ ॥
सकळधरणिपाळा पांडवी भंगु केला ।
विन मगधनृपाळा अर्ज्जुना मोडु जाला ॥
द्विजनट अवगौनू श्रीहरीभीमसेनू ।
हरिहय झडकौनू मागधा जातिलीनू ॥ १७९ ॥
सृतिवचनरवातें आइकें पैं घनातें ।
मगधपति तयातें हांकरी तो सभातें ॥
मगधनृपति बोले एथ कां यान केलें ।
मधुपति मग बोले युद्ध याचें युगाळें ॥ १८० ॥
ह्मणतु मगधुराणा अर्ज्जुना पाडहीना ।
हरि तुज रणहीना पांडु नाही वदाना ॥
मज हरि समजा ना पांडु पैं भीमसेना ।
सगरसमरवाना चालिला वैरिराणा ॥ १८१ ॥
प्रकटत रणवीरा कांपली भूमि धीरा ।
तनु हलखरसारा जर्ज्जरा लोहधारा ॥
विघडिति गिरिकूटें पां पराघात नेटें ।
घनघनरव फूटे अंबरी सादु ऊठे ॥ १८२ ॥
दोंघा निर्घात शंका कडकड थडका हानती एकमेका ।
ब्रह्मांडा संधि खंडे फणिनृपति--फडे जर्ज्जरीभूत पींडे ॥
हांका देती प्रचंडा सुतडक निबिडा हांणती ते फडाडा ।
तेनें भूगोळ नादें बधिर रणमदें गर्ज्जती शैळवृंदें ॥ १८३ ॥
दोघांचा टंकघाती कुधर तडकती जानुदन्नां उडंती ।
भूगोळी धूळि दाटे रविकिरण झटे अंधकारी विलोंटे ॥
भीमा गोविंदु खूणा करधृतइशना दावि चीरूनि दूणा ।
कोंपें त्या भीमु भींडे करि विषम धडे मागधा प्राण सांडे ॥१८४॥

हांहाकारें भरोदें हितजनुदरदें मागधा पुत्रखेदें ।
त्याचें त्या राज्य देतु प्रभुनत बहुतु बंदिशाळे प्रगंतु ॥
रायां सोंडी तदंता अयुतयुगशता आठ गोविंदु शांता ।
सांघे संवित्ति जालें मुनिनृप उरले धर्मयज्ञासि आले ॥ १८५ ॥
यज्ञांती फणि दाटि दुर्जय यती ते उत्तरी श्रीपती ।
राजा धर्म करी हरी ऋषि स्तुती पैं अग्रपूजा मती ॥
वृष्णींद्रा शिशुपाळु गाळिशत दे तो मारिला श्रीपदें ।
धर्मा यज्ञु करूनियां हरि पदें द्वारावती ये मुदें ॥ १८६ ॥
रुद्रातें शोभ राणा खरविधिकळना तोख विजृंभमाणा ।
त्यातें पैं शूळपाणी वरितु वरु रणी यादवां जुंझ हांनी ॥
यज्ञा गेला मुरारी मग मधुनगरी वेढिली पैं महारीं ।
गर्जे आकाश--खोरा घडघड समरा हांकरी वृष्णि वीरा ॥१८७॥
तेथें प्रद्युम्नवीरा यदुवर समरा चालिला युद्धपारा ।
विंधीला शाल्वु बाणी गगनगतुगणी कार्मुका टंकरूणी ॥
वृष्णी पैं सिंहनादें रणरभसमदें हांकिती वैरिवृंदें ।
कुंती खड्गी कराळी प्रदळिति तुमुळी वैरियां अंतराळी ॥ १८८ ॥
खीळीलें शाल्ववीरा दळसहित खरा जर्ज्जरीभूतसारा ।
संग्रामी पैं समोरी नुपरवति अरी ते तिरोभूतचारी ॥
विस्मो दाशार्हवीरां प्रकटत विधुरा सागरी वैरिवीरा ।
वृष्णि देखौनि कीळा खिळिति सरकळा सागरी छद्मलीळा ॥१८९॥
त्यातें विंधेति बाणी मग गतगगनी भूतटी देखऊनी ।
पांतां ते वृष्णिवीरा न दिसति मिहिरा पातले अंधकारा ॥
अंधारें घोर जालें नयनगति गळें वर्षती ते सिसाळें ।
रक्ता पर्ज्जन्यधारा भय धडनिकरा यांदवां कंसकारा ॥ १९० ॥
वर्षे दंता शिळौंका द्रुम घनकरका देखतां कोपशंका ।
पावे प्रद्युम्न रोखा कपटपटुमुखा मायिकावर्य देखा ॥
मायाविक्षोभनाथा दळि कपटपथा दारुकू गोपिनाथा ।
शाल्वें प्रद्युम्न हाला विधुरशरकळा गर्ज्जला मेघलीळा ॥ १९१ ॥

शौरी निश्चेतु जाला मग रथु वाहिला धूर्धरें काढियेंला ।
संग्रामीहूनि चेतोहरिसुतु नयेंता बोलिला वाक्य सूता ॥
संग्रामी पाठि देणें अनुचित करणें लंधिली नीति येणें ।
आतां संग्रामभूमी मज निनिविषमी ने रथा तेथ कामी ॥ १९२ ॥
शाल्वा प्रद्युम्न हाने घडघडित रणें दुर्गदाघातुतानें ।
शाल्वा मूर्छा न संटे अवनिसि झगटे तो तिरोभूत नेटे ॥
ऐसा प्रद्युम्न तेरा दिन करि समरा शाल्वराजें प्रघोरा ।
ऐसा काळी मुरारी गरुडतनुचरी द्वारके एतु शौरी ॥ १९३ ॥
शौरी देखौनि वीरां हरिसुतमुखरा यांदवा तोख धीरा ।
टाकौनी शाल्व गेला यदुचय त्यजिला कृष्णु शोंभेचि हेळा ॥
शोभस्था शाल्ववीरा खिळितु सरसरा बाणजाळी तिखारा ।
शाल्वें शौरी त्रिशूळें धगधगितबळें सिंथिला पैं विलोळें ॥ १९४ ॥
गोविंदें त्या त्रिशूळा तळपत चि झळा तोंडिलें बाण लीळा ।
शाल्वू धोंडी प्रचंडा वरुषतु झगडा चूर्ण शौरी थडाडां ॥
केलीया पैं कुठारी खळबळ समरी तोंडिलें बाण भारी ।
रक्ताचा पूरु वाहे भडभड निबहें कोपला शाल्वु लाहे ॥ १९५ ॥
सैन्या देखौनि आट्ट अतिरणसुभट्ट जे गदा देव ताटू ।
त्या हाला शौरि रोखें हरि--करु तरखे कार्मुका पातु देखे ॥
संतोषे शाल्वु तेथें यदुवर दुरथें वैरिभारा सुखार्थें ।
कोपें गोविंदु चाले रगाडित सकळें वैरिसैन्यें विशाळें ॥ १९६ ॥
संग्रामी धीरवीरा हरि दळितु वरा एकला वैरिभारा ।
तोडी चक्रें मुरारी खरतर समरी नंदकें वैरि मारी ॥
गर्ज्जे निर्घातनादें हरि समरमर्दे मारिली वैरिवृंदें ।
तेथें कौमोदकींतें प्रहरुनि निरुतें भंजिलें वैरियातें ॥ १९७ ॥
ऐसा शौरी विशाणें तवं गतु गगनें शाल्वु अंतर्दधानें ।
तेथें मध्यान्हकाळीं रिपुवरकुटिळी संगरी माव केली ॥
देखे तो चक्रपाणी स्वजनकुजननी बांधली दैन्यवाणी ।
अंबा भाषी कृपेतें हरि हरि निरुतें सोडवी दंपतीतें ॥ १९८ ॥

शौरी पैं दैन्य मानी प्रवदतु वचनी हांकटा चक्रपाणी ।
वेषा दे मानु भूरी ह्मणतु हरि हरि कायिं कीजे मुरारी ॥
तें भावी थोर शंका त्रिसपदघटिका ते तिरोभूत लोका ।
अंबे तातासि मा भी यदुनृपति न भी देखिला शाल्वु शोभी ॥ १९९ ॥
शौरी विंधौनि बाणी कडकडित रणी अंबरा गर्ज्जऊनी ।
शोभाचें चूर्ण केलें तडतड शकलें अर्णवी पाडियेलें ॥
शाल्वाचें शीर द्वारी नवनिशितशरी अंबरी पैं मुरारी ।
पुष्पा वर्षाव जाला हरिविजयकळा द्वारकेमाजि गेला ॥ २०० ॥
पाठी गोविंदु मारी बळकटु समरी दंतवक्रा सुरारी ।
जीवज्योतिःप्रसारी चरणगत सुरी देखिली पैं मुरारी ॥
वैकुंठी वृष्णिमौळी जयविजयफळी घातले दैत्य केळी ।
शापें ते दैत्य मूळी जनित ऋषिकुळी चैद्यु कालिंग काळी ॥२०१
देवादैत्यासि काळू प्रतिरणसबळू लोकपाळा कराळू ।
जुंझी बाणी तिखारी वधि हरि समरी तो विदुर्यानवैरी ॥
भ्रातृव्या पूतनाधी वधितु निरवधि तो विदुर्यान युद्धी ।
सर्वांती उग्रसेना सकळनृपजना निम्न केलें सुजीर्णा ॥ २०२ ॥
सौभद्रा नीळकेतू करि बळसहितु वत्सळा दानदातू ।
धर्में पैं द्यूत खेळें सकळ गमविलें द्रौपदीबंधुशीळे ॥
हीरे वस्त्रें समाजी कुरुपति सरजी द्रौपदीची दुरौजी ।
तेथें पावे मुरारी वसन वसकरी राखिली कीर्ति शौरी ॥ २०३ ॥
सौभद्रें वत्सळेतें मधुपुरगमितें भंगुनी कौरवातें ।
नेलें त्या दे मुरारी प्रवण्पाविधि वरी वत्सळा पैं कुमारी ॥
दुर्वासा द्रौपदीतें कुटिळ वनगतें मागतू भोजनातें ।
हारी दुर्वासगर्वा मधुपति बरवा पांडवा देतु जीवा ॥ २०४ ॥
कांतारी द्रौपदीसी हरि कुटिळ वशी सिंधुराजु प्रवासी ।
त्यातें पैं भ्रांत केलें मधुपति वहिलें रक्षिलें सत्व बाळें ॥
कर्मीरें पांडुपोतां धरुनि अवचितां चाळवीलें समस्तां ।
त्यातें मारी मुरारी रिपु दहन करी भीमसंयुक्त शौरी ॥ २०५ ॥

शौरी वैराटदेशी शिवतरकळशी भेटला पांडवासी ।
शिष्टायीलागि वीरा कुरुपतिनगरा जातुसे नीतिसारा ॥
तेथें दुर्योधनातें शिकवितु निरुतें राज्य दे पांडवातें ।
त्या शब्दा तो न मानी मग हरि सरणी लागतां घाट वाणी ॥२०६
तेथें विज्ञान केलें हरि कुरुजवळें राजया ताडवीलें ।
घे तेथें भाव कर्णा निजविदुरवना चालिला वृष्णिराणा ॥
वृष्णीतें दे सहाया हळधर समया कौरवा शौरि माया ।
नोदी ताळध्वजातें वृक जठरगतें मारवी बभ्रु घातें ॥ २०७ ॥
विपरित तिथिवेळा तो करी आजि लीळा ।
समरगत नृपाळा भेदु सैन्यासि केला ॥
रणपटहतुरादी शंखभेरीनिनादी ।
प्रकटत रणभेदी हल्लकाल्लोळ शब्दी ॥ २०८ ॥
प्रचळत घनधारा शस्त्रसंपात वीरा ।
हरिहयरथ सूती ठेविला पैं रणांती ॥
निजसख कुरुवीरा पार्थु देखे समोरा ।
सकरुणरववादा थोर पावे विषादा ॥ २०९ ॥
हरिहरिहयवीरा मोह नाशी विषारा ।
प्रकटुनि कळरूपा दाखवी विश्वरूपा ॥
बहुत मुकुटमाळा भीमदाढा कराळा ।
कळकळ बहु भूतें खेचरें वीर्यवंतें ॥ २१० ॥
विकट भट सिशाळा देखिलें रुंडमाळा ।
तळपत रविमाळा कोटिसंख्या विलोळा ॥
हरिहययदुनाथा उत्तमाश्लोकनाथा ।
विनवितु तवं पंथा जी न लंघी निजार्था ॥ २११ ॥
ऐसा संग्राम होतां यदुपति निरुता मारवी भौमपोता ।
पार्थेसी भीष्म भींडे दिनकर खिरडे बाण जाळी वितंडे ॥
त्या दोंघा बाणजाळी खगत पळपली ते विमानें पळाली ।
गर्जे भीष्मू रणांती घनघनविरुती बृद्धजुंझारनीती ॥ २१२ ॥

पार्थे संधान केलें खर सर दळिलें विंधिला भीष्म काळें ।
त्या बाणा भीष्म तोडी रणभट रगडी कोपला कापखंडी ॥
घाली अंबापतातें हरिहय निरुतें वन्हिकल्लोळवातें ।
आलें भीष्मा न संटे निजतनु झगटे गर्ज्जले थोर नेटें ॥ २१३ ॥
तेथें तो भीष्मुराणा गुरुशरकळना शस्त्र तोडी सीहाणा ।
काढी बाणा तिखारी रिपुदळन करी ज्याप्रतीकारहारी ॥
पैंजा सांडौनि शौरी अरकळन करी मारवी भीष्मु भारी ।
भीष्मू कोदंडपाणी अमित सरवणी मोरु केला खिळौनी ॥ २१४॥
सांभाळी भीष्मुवीरा हरिशराविधुरा तो स्तवी वृष्णिवीरा ।
द्रोणेंसी पार्थु जुंझे सुरनवट बुझे फेडितू भूमि वोझें ॥
मारी कैवर्तवीरा हरिहयसमरा व्यूह भेदी कुमारा ।
सौभद्रा घातु जाला कपिपद विकळा पैंज घे शत्रुहोळा ॥२१५ ॥
सातां अक्षौहिणीतें वधउनि निरुतें सांध्यकाळी दहातें ।
शौरी पैं पार्थराजा करवि शररुजा मारवी सिंधुराजा ॥
तेथें पैं पार्थवीरा करवि अरिशिरा पाटवी बाणधारा ।
ते गेले शीघ्र चोरी निज जनक करी तो पडे सिंधुतीरी ॥ २१६ ॥
पाचारी भीमपोता मधुपति निरुता पाठवी कौरवांता ।
तो रूपें घोर जाला गिळितु रिपुकुळा राक्षसाधीशलीळा ॥
त्यातें आदावळीतें प्रहरुनि निरुतें कर्णु मारी रणांतें ।
शौरी पार्था विशाळा अतिकुटिलकळा द्रोण पैं मारवीला ॥ २१७ ॥
कुंतीया वन्हिचीरा हरि वितरि खरा आणवी बाणसारा ।
कर्णापासूनि पार्था करवि रणपथा मारवी कर्णु मंथा ॥
संग्रामी पार्थ रायां करवि हरि तया मारवी शैल्यरायां ।
शौरी पैं कर्णपोता वधु करि निरुता घोररूपें दुरंता ॥
लोहाचा भीम अंधें कवळुनि वसुधें चूर्ण केला वरोधें ।
कृष्णें कौशल्य केलें मरण चुकविलें अंधहातें विशाळें ॥ २१८ ॥

॥ षट्पदी ॥

स्तब्धी सूर्यासि शौरी कुरुपतिसमरी भीमसेना मुरारी ।
आज्ञा दे वैरिघाता वधि समरगता कौरवां तो समस्तां ॥

वंची दुर्योधनातें हरि कुसुमवृतें चालिला तो रणांतें ।
तेथें संघर्ष जाला विधुररणकळा भीमसेना नृपाळा ॥ २१९ ॥
आरंभें जुंझ दोघां प्रतुमुळ अरिघा कौरवा भीमराघा ।
शस्त्रास्त्री घातभेदा दळित रणगदा पातली भूमि खेदा ॥
दोघैं वज्रांगदेही रगडिति निवही पर्वता भारवाही ।
धोंडी घांती विशाळा दळदाणितकुळा भूतळा कंपु जाला ॥२२०॥
दोघा आंगी विशाळा स्फुटति गिरिशिळा चूर्ण होऊनि हेळा ।
लोहाचें चूर्ण जालें उपरि भिडिनले मल्लविद्याकराळें ॥
शौरी भीमासि दावी करखुण बरवी पाडिला मल्ल गोवी ।
राजा भीमें विसोंद दळित रणगदें होत भग्नोरुखेंदें ॥ २२१ ॥
ते रात्री कृप मूसळी निशिभरी द्रोणात्मजू प्रोत्तरी ।
मारी सुसदळा युधिष्ठिरपुरी शस्त्री तिखारी शरी ॥
तेथें वारित माधवू हळधरा त्या पांडवां संगरी ।
सर्वी ऐक्य करूनियां निजपुरा धाडी हळी तें वरा ॥ २२२ ॥
क्रोधें फाल्गुणबाळ कौरवकुळा मारी शरी दुःकळा ।
रक्षीला वृषकेतु निर्ज्जरकळा तैं कुंतियां पाळिला ॥
शौरी कौरवअंबिकेसि समरी संबोखिलें उत्तरी ।
राजा धर्मु नृपासनी नृपवरी पैं बैसवीला हरी ॥ २२३ ॥
अश्वत्थामा विशाळी कुरुजपतिकुळी ब्रह्मशस्त्रासि घाली ।
संहारी तें समस्तां कुळजननगता पांडवीग्रा सुपोता ॥
तेथें वैराटबाळा स्मरत घनकळा पावला दिव्यलीळा ।
रक्षी गर्भस्थितातें अरशयनिरुतें संकटी नंदनातें ॥ २२४ ॥
जाला नासु स्वजातां कुरुसमरगतां भारतां पैं समस्तां ।
पूसे भीष्मासि राजा विकळित विरजा मोक्षधर्मा महौजा ॥
गंगेचा पुत्र बोले अतिकुशळ भले मोक्षसाधर्म्य काळे ।
शौरी पैं आदरंते कुरुसह निरुते आयिकीलें महांते ॥ २२५ ॥
व्यासा धर्में सुशीळा कुळवध समळा शाळना प्रश्नु केला ।
त्या सांघे अश्वमेधा बहुकरणविधा राजया पुण्यराधा ॥

त्या सिद्धी नेतु शौरी नृपवर समरी जिंकवीले मुरारी ।
यज्ञाचा अंतु जाला कुशळविधिकळा द्वारके कृष्णु गेला ॥२२६॥
शौरी पैं वज्रनाभा वधि दनुजसभा पातले देव शोभा ।
केलीयां पुष्पवृष्टी मधुपतिमुकुटी वंदिती पैं किरीटी ॥
सांघे गोपाळ मल्ला हरि अतिरुचिरा भीमकीये सुनेत्रा ।
वारी पैं पुत्रजातां मधुभुजि बहुतां यादवां देव नेतां ॥ २२७ ॥

॥ एवं भारतकथा ॥

॥ आतां लीळापंचविंशी ॥

यदुपति निजभक्ता राजदाता प्रसक्तां ।
पुनरपि विदिवक्तां अर्ज्जुना विस्मृतोक्तां ॥
विनवि हरि विधाता देवराजा प्रयाता ।
विषयविनयगीता श्वेतवाजीसि हूता ॥ २२८ ॥
वाग्वज्रें विप्रजातां यदुकुळकळितां मौशळा या महंता ।
जाला घातु प्रभासे यदुकुळ विनशे एरिकां जाळ हासे ॥
योगाभ्यासें तनूतें हळधरु निरुतें त्याजिता सागरातें ।
योगाग्नी कृष्णराणा निजतनुदहना तो करी धामधाना ॥ २२९ ॥
धर्माकुंती समस्ता श्रुतबहुदरतां कुंतिये प्राण गंता ।
वज्रा राज्याभिषेषू करित कुरुवसू यादवां भूतशेषू ॥
स्थापी सौभद्र गोदी निजविषयपदी पांडवां यान सादी ।
जाले हैमाचळासी व्यसु सजनिवशी धर्मु गेला दिवासी ॥ २३० ॥
दैत्या मारूनि शौरी कुरुपतिसमरी पांडवां व्याज भारी ।
विप्रा शांपें मुरारी दळित यदु हरी उद्धवा बोध कारी ॥
बीजें पैं स्वीयधामा करित निजरमा रुक्मिणी सशिुधामा ।
कुंती धर्मादि धामा निनितु सुभसमा गोपिका स्वीय रामा ॥२३१॥
श्रीमल्लीळारसारा परशरणपरा गोपगोपीविहारा ॥
कैवल्यासारकारा परतवमिहिरा नामलीळानुसारा ॥
मायाविघ्नप्रहारा विगळितविसरा मानिनीमोहसारा ।
दिव्या चित्तानुकारा सकळसुरवरा त्वां नमो वृष्णिवीरा ॥ २३२ ॥

लीळैकविग्रहमघा वरदा अमोघा ।
सद्विग्रहा सदनघा कळिदोषलंघा ॥
दत्तात्रिपुत्र सरघा श्रुतिमूळराघा ।
शुभ्रप्रकाशकरघा प्रणतोस्मि रंघा ॥ २३३ ॥
भूकार्त्तवीर्यवरदा यतिमार्गमोदा ॥
नेळर्कतापकरदा मितवेषसादा ॥
शार्दूळवेषतनुदा प्रभुचारुवेदा ।
पीताख्यदत्तसुविदा प्रणतोस्मि गोदा ॥ २३४ ॥

तूं मूळपीठ सुंदरा प्रभु एकवीरा ।
संस्थापका परिकरा परशर्मकारा ॥
सैंहाद्रिचूळवसरा रुषिदेषधारा ।
संसारदारणकरा प्रणतोस्मि सारा ॥ २३५ ॥
देवेंद्रवंद्यपदकामितभूमहौका ।
कारुण्यशक्तितनुका धृतसप्तशाका ॥
मध्यें परावरवृका सफळा रतैका ।
सुद्धेश्वरा शजनका प्रणतोस्मि लोकां ॥ २३६ ॥
वर्यांबिकाजतनुता परलक्षणांता ।
सादिव्यशक्तितनुता धृतशक्तिवीता ॥
सृष्टयंतकाळतनुता वरदिव्यमूर्त्ता ।
स्वीयां निजांतु गमिता प्रणतोस्मि कांता ॥ २३७ ॥
लीळा देहा विदळित दहा रक्षिता जो समूहां ।
जीवां प्रौहा भवनभयहा खेळनें देवमोदां ॥
खेळे लीळा वरित सकळा द्वारके चारुमाळा ।
नामा काळा दळित समळा सन्नतोहं सुलीळा ॥ २३८ ॥
क्षेपी पुंजे सरिति विरजे मार्ज्जनी हस्त सज्जे ।
झाडी वीथी परिसरपथी सुर्पहस्ती प्रमंथी ॥
हाने धीरा हरि जनिभरा मार्ज्जनी सुर्पसारा ।
विद्यामार्गा वितरि सुभगा सन्नतोहं व्यनंगा ॥ २३९ ॥

तीरी गंगे सदन सुभगे गुंडमेशा विरागे ।
सुर्पे हाने वरपरखुणे देतु जाज्वल्यमाने ॥
शुक्ला दुंडी वितरि उघडी मार्गमंत्रा सुताडी ।
देवाधीशा परमपुरुषा सन्नतोहं परेशा ॥ २४० ॥
संख्याहीना नरवरजना सिद्धि दे देवराणा ।
विद्यादाता भवगजहता बावना देव नेता ॥
योगीलोका चरणभजकां देत आनंदतंका ।
नामें पीता प्रमुदितगता सन्नतोहं सदंता ॥ २४१ ॥
मायावेषा कळितपरुषा सत्फळा सर्वभाषा ।
लीळाखेळा द्विजकुळकळा केळिहेळा सुलीळा ॥
चित्रालीळा दळितस्समळा केवळा दिव्यकीळा ।
देवीवेषा दळितपरुषा सन्नतोहं सुवेषा ॥ २४२ ॥
चरणकमळलीळानंद दे योगिमाळा ।
जळधरतनुमाळा श्यामळा मूर्त्तिशीळा ॥
लपननयनलोळा रुद्धिपुर्ख्या विशाळा ।
सुरनरमुनिकेळा त्वां नमो गुंडकेळा ॥ २४३ ॥
क्रिमिविधिपददाना भावमूळप्रहाणा ।
कळितलळितमाना बाळलीळाविमाना ॥
परमफळविशाणा केवळा कर्मभिन्ना ।
प्रभुपरतरकाना सन्नतोहं सदन्ना ॥ २४४ ॥
गगनकरजशाखा दावि टाळी सुरेखा ।
घटित वदत लेखा आत्मना आत्मभाखा ॥
प्रतिसदनसुलीळा खेळु खेळे सुबाळा ।
प्रभु कारि पद मेळा सन्नतोहं सुकाळा ॥ २४५ ॥
विभुचरमसुदेहा श्लेषकारी विदेहा ।
अमळनरसमूहा सेव्य देवेंद्रवाहा ॥
करधृतसुभखाद्या देतु संवित्ति आद्या ।
प्रभुपरतरविद्या सन्नतोहं सुवंद्या ॥ २४६ ॥

गळितगुणसमूहा ब्रह्मविद्यावराहा ।
हरिपर गुरुलेहा पंकजामोदमोहा ॥
अकळवदनभाशा माधवा गुंडमेशा ।
प्रभु जयजय केशा सन्नतोहं कृपेशा ॥ २४७ ॥
श्रीमच्चक्रेशराणा निजपरमखुणा भूतळीं सेव्य जाणा ।
खेळे लावण्यहेळा विदळित समळा नागरा आर्यलीळा ॥
संवर्य्यो नागदेवा करुनि निजभवा वर्य्यबोधप्रभावा ।
स्थापीलें ज्ञानमार्गी परतरसुभगा नेत पैं दोष भंगा ॥ २४८ ॥
मार्गी मार्गीण भूता अवरगतिरता पंचवीशा फळांता ।
जीवा संसाध्य दाता उपरि निगमिता साधनें साध्य घेता ॥
वेधें विद्धा अनंता अवतरुनि रता कर्मभूमीसि संता ।
संपादी केवळांता प्रभुसदयमता चारिभेदा महंता ॥२४९ ॥
एका उत्कर्षकारा विमळरतिपरा देतु कैवल्य धीरा ।
शुद्धा चौं जों प्रकारा गाळितगुणपरा सद्गती दे प्रकारा ॥
एका पंचप्रकारा भवनिपुणपरा शक्तिरूपाविकारा ।
संबंधाप्राप्तसारा हरुनि हरि वरा देतु युग्मप्रकारा ॥ २५० ॥
ऐसें प्रापंचिकांतें प्रभु नर निरुतें पावऊनी तदंतें ।
त्या दे कैवल्य वेधा सुरचिरविविधा आनिक्का ब्रह्मबोधा ॥
वर्य्या साध्यासि दाता सकळगतसता सृष्टिमध्यें सुनेता ।
जीवा साध्या समर्था प्रगतपरपथा कारुणामुख्यअर्था ॥ २५१ ॥
तेथौनी देवराणा निनितु वरजना साधनें साध्य जाणा ।
ऊर्ध्वा साध्यासि दाता प्रमुदितमहता मुख्य आब्रह्मभूता ॥
ज्याची संख्या न वर्णे उदितपरखुणे भूति पैं कोण जाणे ।
ज्ञानी संभ्रांत जाले उभयज उगले एर ते अंध जाले ॥ २५२ ॥
सप्तांगी सप्तभूती मुनिवरसुगती पावती भिन्न जाती ।
एकी आप्राप्त सर्वा सुरवरविभवा तेथ नाही रिगावा ॥
शुद्धा ब्रह्मानुभूती न पवति निरुती दुर्लभा ते तदंती ।
एकाधा भाग्यवंतू प्रगतअनुमतू प्राप्तियोग्य प्रसक्तू ॥ २५३ ॥

आनंदा सानुभूता अरकर निरुता योग्य तेथे चि पांतां ।
सद्विद्या योग्य तेथें गमितपरपथें ज्ञानियां भ्रांति जेथें ॥
तीभागीं वर्त्तमाना परतरगहना पंचपंचांगभिन्ना ।
पंचांगी सप्तभाषा युगयुगपरिशा अंगमुख्या विभाषा ॥ २९४ ॥
आनंदें पूर्ण शोभे अविकर सुलभे देवराजे सुदर्भे ।
एराचा पाडु कोठें विभु वदन पठे कर्मभूमींसि पेठें ॥
थोरा जें थोर सर्वां अजनिजविभवा वर्यवर्या सुहावां ।
ऐसें तें ब्रह्मवेदा विभुभवन सदा ज्ञेय नान्या सुवादा ॥ २९५ ॥
दिव्यां दिव्या प्रसिद्धा मुनिजन विविधा पावले प्रेमवेधा ।
आठातें एकि वर्य्यो वरजनिनिचया दिव्यदिव्यां महार्यां ॥
जीचा वृंदावनांती जनिचय मिळती त्या समावेश होती ।
ऐसी ते दिव्य मिश्रा सकळपरतरां मुख्य सोळासहस्रा ॥ २९६ ॥
कैवल्या मुख्यवर्य्या मुनिवरसमयां प्राप्त जाले वरायां ।
अष्टांगा अष्टभेदा नवनवसमुदा एकका मुख्यभेदा ॥
त्यातें कोण्ही चि नेणें विन परमखुणे शक्तिसंघू न जाणे ।
जानासि भ्रांतचित्ती अविदितसुगती जाणिजे ते महांती ॥ २९७ ॥
आठां ही मुख्य गौरी त्रिविधतनुहरी मुख्य हें रीति आरी ।
एरी गौरी अपारा प्रभुवरितवरा मुख्य आरावधारा ॥
चित्संज्ञा चित्रवेषा अमितविभुवशा साध्यदाती मुनीशा ।
आरां पंचांगमाळा सकळनिजकळा तेथ जीवांसि कीळा ॥ २९८ ॥
गौरीनामा धरुनि विनमा चक्रपाणी सुशर्मा ।
आनंदातें करित निरुतें सर्वशक्तींसि अंतें ॥
वेधें वेधी सकळ अवधी प्राणसर्वांगसंधी ।
द्रावी चेता सुरवरगतां थोरु आल्हाद कांतां ॥ २९९ ॥
लीळायुग्में सकळ सुगमें मोदवी देव वामें ।
तेथें रामा प्रगत विरमा नीववी वर्य्य वामा ॥
दग्धें चेतें मुदितजनितें तो करी गौरीभूतें ।
भूतां शांती निजपरगती पावती लोकयुक्ती ॥ २६० ॥

सृष्टीमाजी परविभु अजी नीववी त्यक्तिराजी ।
सुद्धानंदी महितसुपदी मुख्य कारुण्यमोदी ॥
देवां योगें परमसुभगें सर्व ही दुःख भंगे ।
कारुण्यातें जनितमुदितें माति ना भूतळांतें ॥ २६१ ॥
आना सांतां विभु निवविता एकिवाचूनि कांता ।
देता मोदा प्रमदसुमदा आनिकां ही सुनंदा ॥
खेळे लीळा प्रमदसकळाकेळिकारा सुहेळा ।
आनंदा दे धवळित मुदे केवळे बोधवेदे ॥ २६२ ॥
पांचा भामां सुकरपरमा येउनी तेथ वामा ।
सौख्या पादी गततळपदी मानिनी मुख्यवेदी ॥
राहे राता विभु निज पिता पावला काळिमाता ।
सर्वां जीवां सुलभविभवां तेथ भेटे विशावां ॥ २६३ ॥
चाले राजा सहगतअजा भक्त ते मुख्यभाजा ।
सर्वा वामा कळितनिजमा उज्ज्वळा दिव्यधामा ॥
त्रैधा मायापुरहरिमया स्वीकरी दिव्यमाया ।
सर्वां जीवां प्रकटितभवां उद्धरी तो सदैवां ॥ २६४ ॥
जय सकळसुतंत्रा भावमूळादिमंत्रा ।
मुनिवरजनगोत्रा पापसंघाळिदात्रा ॥
कमळदळसुनेत्रा चारुसर्वांगगात्रा ।
जनितसकळसत्रा रक्ष मातें विचित्रा ॥ २६५ ॥
करित अचळ वेधें चेतनें वेधविद्धें ।
द्रुमगिरिनरसिद्धें स्थावरें जंगमाधें ॥
सुरनरसुनिमौनीदर्शनें देवयोनी ।
स्थगितगतिविमानी होति वेधें सुमौनी ॥ २६६ ॥
अवनिगतनवीना देवतादेवलीना ।
खगपशुफणिमीना वेधु वेधी विताना ॥
अतनुतनुजनातें वेधिलें गौरिकांतें ।
अरिभवगतभूतें वैरशून्यें महांतें ॥ २६७ ॥

७ हें काव्य इतकेंच अपूर्ण सांपडलें. मूळ पोथींत अनुस्वार, मात्रा वगैरे चिन्हें ज्याप्रमाणें होतीं तशींच तीं येथें छापलीं आहेत. सध्यां प्रचलित नसणाऱ्या शब्दांची सूचि देतां आली असती तर फार बरें होतें. सध्यां प्रचलित नसणारे असे सुमारें १००० शब्द ह्या काव्यांत आहेत. नामें, अव्ययें, क्रियापदें ह्यांची रूपें, समासांची पद्धत, वगैरे बरेच प्रकार विवेचनीय आहेत. व, कीं इत्यादि फारशी उभयान्वयी अव्ययें; त्याप्रमाणेंच चतुर्थीचा ला प्रत्यय ह्या काव्यांत नाहीं. नासु, पार्थु, कृष्णु, कंपु, वगैरे नामांचीं उकारान्त रूपें; देतु, प्रचळतु, मारितु, वगैरे क्रियापदांचीं उकारान्त रूपें; चोरुनु, झडकौनु, अवगौनु, वगैरे ऊन प्रत्ययान्त धातुसाधितांचीं उकारान्त रूपें ह्या काव्यांत बरींच आहेत. एकंदरींत भाषेच्या जुनेपणाचा मासला ह्या काव्यांत सडकून सापडतो. मुसलमानांच्या संसर्गानें भाषेवर कांहीं परिणाम होण्यापूर्वींची भाषा ह्या काव्यांत दृष्टीस पडते. काव्यांत म्लेछ शब्द तिरस्कारार्थी आला आहे. मानभावाचा मुख्य देव जो गुंडमेश, गुंड (कृष्ण) त्याच्या उल्लेख येथें दोन तीन ठिकाणीं केलेला आढळतो.

---

७ हें काव्य इतकेंच अपूर्ण सांपडलें. मूळ प्रतींत अनुस्वार, मात्रा वगैरे चिन्हें ज्याप्रमाणें होतीं तशीच तीं येथें छापलीं आहेत. सध्यां प्रचलित नसणाऱ्या शब्दांची सूचि देतां आली असती तर फार बरें होतें. सध्यां प्रचलित नसणारे असे सुमारें १००० शब्द ह्या काव्यांत आहेत. नामें, अव्ययें, क्रियापदें ह्यांचीं रूपें, समासांचे प्रकार, वगैरे अनेक प्रकार विवेचनीय आहेत. द, कीं इत्यादि फारशी उभयान्वयी अव्ययें; त्याप्रमाणेंच चतुर्थीचा [illegible] ह्या काव्यांत नाहीं. रामु, पार्थु, कृष्णु, केशु, वगैरे नामांची उकारान्त रूपें; देतु, पावलु, आलितु, वगैरे क्रियापदांची उकारान्त रूपें; बोलतु, [illegible], [illegible], वगैरे अन प्रत्ययान्त धातुसाधितांचीं उकारान्त रूपें ह्या काव्यांत बरींच आहेत. एकंदरींत भाषेच्या पुरातनपणाचा मासला ह्या काव्यांत उठून सांपडतो. मुसलमानांच्या संसर्गानें भाषेवर कांहीं परिणाम होण्यापूर्वींची भाषा ह्या काव्यांत दृष्टीस पडते. काव्यांत [illegible] शब्द [illegible] झाला आहे. मानभावाचा मुख्य देव जो गुंडमराउ, गुंड (कृष्ण) त्याच्या उल्लेख येथें दोन तीन ठिकाणीं केलेला आढळतो.